|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १४ अंक : १ सोमवार दि. १९ जानेवारी २०२६ ते रविवार दि. २५ जानेवारी २०२६ पाने : ८ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड


## वसई विरार महापालिकेतून भाजपाच्या 'कमळा'ची सुट्टी भूमिपुत्रांनी वाजवली बहुजन विकास आघाडीची 'शिट्टी'

वसई : लक्ष्मणराव पाटोळे

नुकत्याच पार पडलेल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीत जवळपास २४ ठिकाणी भाजपची सरशी झाली. मात्र मुंबई लगतच्या वसई विरारमध्ये बहुजन विकास आघाडीने ७१ जागा जिंकून आपली सत्ता कायम राखली. इथे भाजपला केवळ ४४ जागांवर समाधान मानावे लागले. बहुजन विकास आघाडीला मिळालेल्या मतांमध्ये प्रामुख्याने स्थानिक भूमिपुत्र असलेल्या आगरी कोळी, वाडवळ, ख्रिश्चन, मुंबईवरून इकडे येऊन स्थायिक झालेले मराठी आणि भाजपच्या सुरुवातीपासून नाराज असलेल्या मुस्लिम समाजाचा अधिक सहभाग होता. त्यांच्यामुळेच बहुजन विकास आघाडीला यश मिळाले. मात्र २०१७ च्या मागील निवडणुकीपेक्षा त्यांची टक्केवारी कमी झाली. या ठिकाणी स्थानिक मुद्दे आणि भाजपा विरोधी लाटेचा बहुजन विकास आघाडीला फायदा झाला. वसई विरार महापालिकेचा ११५ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपकडे सर्व सरकारी यंत्रणा असतानाही स्थानिकांच्या पाठिंब्यावर भाजपने बहुमतापेक्षा अधिक जागा मिळवल्या. प्रभाग क्रमांक १, ३, ४, ६.०१, ७, ८, ९, १२, १३, १४, १९, २०, २१, २३, २४, २५, २६, २७, २८, २९ आदी प्रभागांमध्ये ७१ जागांवर यश मिळाले, तर भाजपला २, ५, ६.०३, ११, १०, १५, १६, १७, १८, २१.०१, २२, २३ या प्रभागात यश मिळाले. भाजपचा मित्र पक्ष असलेल्या शिंदे सेनेला अवघी १ जागा मिळाली. राष्ट्रवादीचे दोन्ही गट, ठाकरे बंधू, वंचित यांची पाटी कोरी राहिली. ही निवडणूक खऱ्या अर्थाने स्थानिक भूमिपुत्र विरुद्ध भाजपा अशीच झाली. आणि यात भूमिपुत्रांचा विजय झाला, बहुजन विकास आघाडीने गेल्या ३५ वर्षात जी कामे केली त्याची ही पोचपावतीच आहे.




वसई विरार मध्ये जो भाजपा विरुद्ध जण समूह होता त्याने एकगठ्ठा मतदान केले. त्यामुळे बहुजन विकास आघाडीला यश मिळाले. तसेच कार्यकर्त्यांनी सर्व प्रभागात चांगला प्रचार केला म्हणून हे यश मिळाले. शेवटी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्थानिक प्रश्नांवर लढवल्या जातात. बहुजन विकास आघाडीने याच मुद्यावर फोकस केला. त्यामुळे त्यांना यश मिळाले. याउलट भाजपाचे २ आमदार आणि १ खासदार असूनही त्यांना आपल्या पक्षाला मते मिळवून देण्यात अपयश आले. आता वसई विरार मधील आपली सत्ता राखणाऱ्या बहुजन विकास आघाडीवर इथल्या लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी आहे. ती त्यांनी पार पाडावी. मागील निवडणुकीपेक्षा हा निवडणुकीत बहुजन विकास आघाडीचा मतांचा टक्का कमी झाला तर भाजपचा वाढला. बहुजन विकास आघाडीयांच्या काही दिग्गज उमेदवारांना पराभवाचा धक्का बसला आहे यातून सुद्धा बहुजन विकास आघाडीच्या नेतृत्वाने धडा घेण्याची आवश्यकता आहे.

१५ जानेवारीला महाराष्ट्रातील २९ महापालिकांच्या निवडणुका पार पडल्या. या निवडणुकीत नेहमीप्रमाणे निवडणूक आयोगाने आपल्या सत्ताधारी मालकाची पाठराखण करताना बोगस मतदान असो की बोटावरची शाई पुसण्याचे प्रकार असोत सर्वांकडे हेतुपुरस्कर दुर्लक्ष करून सत्ताधारी भाजपला मदत केली. या निवडणुकीत ठाकरे बंधूंची युती भाजपला भारी पडेल असे वाटले होते पण तसे झाले नाही. कारण निवडणूक आयोग भाजपा आणि त्यांच्या मित्रपक्षांच्या मदतीला होता. विधानसभा निवडणुकीत वसईत २ आमदार निवडून आल्यामुळे इथले भाजपाचे नेते हवेत होते. भैय्ये लोक तर वसई विरार त्यांच्या बापाची असल्यासारखे वागत होते. इथल्या भूमिपुत्रांशी तुसडे पणाने वागत होते. वसई विरारमध्ये आता आपलीच सत्ता येणार अशा आविर्भावात वागत होते. या उलट विधानसभा निवडणुकीत गाफील राहिल्याने ठेच लागलेले बहुजन विकास आघाडीचे नेते सावध झाले होते. त्यांनी पद्धतशीरपणे आपली संघटनात्मक ताकत मजबूत केली. ...पान २ वर

## संशयाने शुभम अस्वस्थ झाला निरपराध जयचा त्याने खून केला






जळगाव : ललित खरे

एकतर्फी प्रेम खूप वाईट असते. यात समोरच्या व्यक्तीने प्रतिसाद दिला नाही की माणूस डिस्टर्ब होतो. तसेच त्याच्या मनात वेगवेगळ्या प्रकारचा संशय निर्माण होतो. जळगावमध्ये अशाच एका घटनेत शुभम सोनवणे नावाच्या तरुणाचे तिथल्याच एका मुलीवर एकतर्फी प्रेम होते. मात्र तिच्या कॉलेजात शिकणाऱ्या जय सोबत तिची मैत्री होती. पण शुभमला मात्र जे बरोबर तिचे प्रेम आहे असा संशय होता आणि याच संशयातू त्याने जयची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.



जय गणेश गोराडे हा अवघा अठरा वर्ष वयाचा तरुण जळगाव शहरातील देवकर महाविद्यालयात अभियांत्रीकीचे शिक्षण घेत होता. अवघ्या अठरा वर्षाच्या जय यास अर्थातच साधी मिसरुढ देखील फुटलेली नव्हती. तो शिक्षण घेत असलेल्या महाविद्यालयात त्याचे फ्रेंड सर्कल तयार झाले होते. त्या फ्रेंड सर्कल मधे एक तरुणी होती. ती तरुणी आणी जय एकाच वर्गात शिकत होते. एकाच महाविद्यालयात आणि एकाच वर्गात शिकणाऱ्या जय गोराडे याचे त्या तरुणीसोबत चांगले ट्युनिंग़ जमले होते. दोघांच्या विचारांची वेव्ह लेंथ चांगली जुळल्याने दोघे एकमेकांसोबत चांगल्या प्रकारे गप्पा करत होते. शैक्षणिक विषयासह इतर प्रासंगिक विषयावर दोघे एकमेकांसोबत विचारांची आदान प्रदान आणि मत प्रदर्शन करत होते. अशा प्रकारे दोघांचा एकमेकांसोबत सहवास वाढत होता.



जय सोबत नेहमी वावरणाऱ्या त्या तरुणीच्या घराजवळ एक तरुण रहात होता. शुभम सोनवणे असे त्या तरुणाचे नाव होते. त्या तरुणीच्या घराजवळच शुभम सोनवणे रहात असल्यामुळे ती नेहमी त्याच्या नजरेस पडत होती. त्यातून त्याचे तिच्यावर प्रेम जडले होते. ती आपली व्हावी असे शुभम यास नेहमीच वाटत होते. कुणी तिच्यासोबत बोललेले शुभमला खपत नव्हते. त्यामुळे शुभम तिच्यावर नेहमी पाळत ठेवत असे. ती महाविद्यालयात जातांना तो तिचा पाठलाग करत असे. ती कुणासोबत बोलते याच्यावर त्याचे लक्ष रहात होते. त्या पाळतीतून तिच्यासोबत जय गोराडे हा तरुण नेहमी बोलत असल्याचे त्याच्या नजरेस पडले होते. जिच्यावर आपण प्रेम करतो ती तरुणी जय गोराडे याची ...पान २ वर

## पत्नीवरच्या रागामुळे पती संतापाने पेटला स्वतःच्या चिमुकलीचा निर्दयपणे जीव घेतला

नागपूर : क्राईम रिपोर्टर

रागाला दया माया नसते. राग आला की माणूस कोणत्याही थराला जाऊ शकतो. पती पत्नी ही संसाराची दोन चाके असतात. त्यामुळे ती एका लयात चालली तरच संसार सुखाचा होतो. अन्यथा लय बिघडली तर संसाराचा सत्यानाश होतो. नागपूरमध्ये अशाच एका घटनेत पती पत्नीतील वादात ८ वर्षांच्या चिमुकलीचा जीव गेला. पित्याने पत्नीवरचा राग मुलीवर काढून तिचा जीव घेतला. या प्रकरणी आरोपी पित्याला अटक करण्यात आली आहे.



नागपूरच्या वाठोडा परिसरातून एक हृदयद्रावक आणि समाजाला हादरवून टाकणारी घटना समोर आली आहे. पत्नीशी सुरू असलेल्या कौटुंबिक वादातून एका पित्याने आपल्या आठ वर्षाच्या चिमुकल्या मुलीची चाकूने निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवारी (१४ जानेवारी) पहाटे घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात संताप आणि हळहळ व्यक्त होत असून, वाठोडा पोलिसांनी आरोपी पित्याला अटक केली आहे. ही घटना वाठोडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सरोदेनगर परिसरातील प्लॉट क्रमांक १२ येथे बुधवारी पहाटे साडेपाचच्या सुमारास घडली. शेखर शेंदरे (वय ४६) असे आरोपी पित्याचे नाव असून, धनश्री शेंदरे (वय ८) असे मृत चिमुकलीचे नाव आहे. धनश्री ही आजी कुसुमबाई आणि वडिलांसोबत राहत होती. शेखर शेंदरे आणि त्याची पत्नी शुभांगी यांच्यात गेल्या अनेक वर्षापासून वाद सुरू होता. पत्नी शुभांगी वेगळी राहत होती आणि मुलीचा ताबा (कस्टडी) आपल्याकडे देण्याची मागणी करत होती. मात्र, शेखर याला तीव्र विरोध करत होता. याच कारणावरून दोघांमध्ये सतत वाद होत असल्याचे सांगितले जाते. आरोपी दारूच्या आहारी गेला होता आणि पत्नीवर संशय घेत मारहाण करत ...पान ६ वर

## दारूच्या व्यसनात नात्याची होळी झाली मुलानेच जन्मदात्या आईची हत्या केली

सिंधुदुर्ग : क्राईम रिपोर्टर



ज्या मातेने ९ महिने उदरात वाढवले. प्रसूतीच्या जीवघेण्या काल सोसून मुलाला जन्माला घातले. स्वतः काबाडकष्ट करून ज्याला लहानाचे मोठे केले त्याच मुलाने दारूच्या नशेत आईची गोळ्या घालून हत्या केल्याची संतापजनक घटना सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या वेंगुर्ला तालुक्यात घडली असून या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. तळकोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली असून आपल्या वृद्ध आईचा पोटच्या मुलानेच गोळी झाडून हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. वेंगुर्ले तालुक्यातील अणसुरे या गावात ही घटना घडली आहे. उमेश वासुदेव सरमळकर नामक मुलाने आपल्या ६५ वर्ष आईची हत्या केली आहे. ठासणीच्या बंदुकीने ही हत्या केली असून, मकर संक्रांतीच्या रात्री हा सगळा धक्कादायक प्रकार घडला आहे.





वेंगुर्ला तालुक्यातील आणसुर मडकीलवाडी येथील आपल्या वडिलार्जीत घरातील दुसऱ्या मजल्यावर उमेश वासुदेव सरमळकर हे पत्नी आणि दोन मुलासह राहयला आहेत. त्याचा भाऊ जयेश हा पोलीस दलात सर्व्हिस करीत असल्याने तो त्याची पत्नी जागृती त्याची दोन मुले आणि आई वासंती सरमळकर हे वेंगुर्ला येथील विनायक रेसिडेन्सी कॅम्प परिसरात राहयला आहेत. उमेश याने अलिकडच्या काळात दोन तीन बँकांकडून कर्जे घेतलेली होती. तो एक कर्ज फेडण्यासाठी दुसरे कर्ज काढत असल्याने त्याच्या अंगावर कर्जाचा डोंगर उभारला होता. त्याच्या बायकोच्या नावावर ही त्याने अनेक बचत गटाकडून कर्जे घेतलेली होती. कर्जे फेडत असताना त्याचा जीव मेटाकुटीला ...पान २ वर

## समलिंगी नात्यात दुरावा आला दारूच्या नशेत मित्राचा खून केला

अकोला : क्राईम रिपोर्टर

दारू पिणाऱ्यांना नशा झाली की त्यांच्यात कोणत्या ना कोणत्या कारणावरून वाद होतात. मात्र अकोल्यात दोन समलिंगी मित्रांमध्ये झालेल्या वादात एकाने दुसऱ्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.



अकोला शहरातील सनसनाटी हत्याकांड घडले आहे. या संदर्भात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दोन मित्रांनी दारुच्या नशेत इतके भांडण झाले की एकमेकांच्या जीवावर उठले. या दोघांमध्ये अनैसर्गिक संबंध असल्याच्या चर्चा सुरु आहेत. परंतू पोलिसांनी लागलीच असा निष्कर्ष काढता येणार नाही असे सांगत अजून तपास सुरु असल्याचे म्हटले आहे. ही घटना गुरुवारी रात्री अकोला शहरातील मोठी उमरी या भागात घडली आहे. मृताचे नाव अमोल दिगंबर पवार असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. त्याच जवळचा मित्र नितेश अरुण जंजाळ याला सिव्हील लाईन पोलिसांनी हत्ये प्रकरणात अटक केली आहे. अमोल आणि नितेश गेल्या तीन वर्षापासून मोठी उमरीच्या संजय नगरात एकत्र राहत होते. स्थानिक लोकांनी दावा केला आहे की दोघांच्यामध्ये संबंध होते. मात्र, पोलिसांनी म्हटले आहे की नात्यांसंदर्भात जी बाबसमोर आली आहे. ती केवळ स्थानिक सूत्रांवर आधारित आहे. तपासात समोर आले आहे की दोघे दोस्त होते आणि त्यांच्या दरम्यान दारुवरुन वाद होत होते. गुरुवारी देखील त्यांच्या दारु पिण्यावरुन वाद झाला होता. त्यातून शब्दाला शब्द ...पान २ वर

## दारूने दिलीपचा घात केला मित्रांच्या हातून फुकटचा मेला

लोणंद (सातारा) : क्राईम रिपोर्टर



दारुडा माणूस एकदा प्यायला आणि दारूची नशा त्याच्या डोक्यात गेली. मग त्याला नातेवाईक किंवा मित्र दिसत नाहीत. तो कुणाशीही कसाही वागतो. त्यामुळे अशा माणसाला कुणीही जवळ करीत नाही. तर अट्टल दारुडा माणूस दारूशिवाय एक दिवसही राहू शकत नाही. लोणंदमध्ये राहणाऱ्या सूरज जाधव याचीही तशीच अवस्था होती. कामधंदा न करता सतत दारू पिऊन मित्राना शिव्या द्यायचा आणि अखेर त्याच्या मित्रांनीच त्याचा जीव घेतला.

लोणंद शहरातील शास्त्री चौकात सुरज दिलीप जाधव हा आपली आई सुनंदा याचेसह राहयला आहे. सुरज हा कोणताही कामधंदा न करता दिवस रात्री दारू पित होता. त्याला दारू पिण्याचे इतके व्यसन इतके जडलेले होते की, त्याला घरच्या परिस्तीतीची जाणीव नव्हती. त्याची आई सुनंदा याच मोलमजुरी करून घराचा गाडा कसा तरी हाकत होत्या. सुरज याने वयाची ३०शी ओलांडली तरी त्याचे अजून लग्न ही ठरत नव्हते. याला कारण म्हणजे तो दारू पित असतो तो कायम दारूच्या नशेतच असतो हे बहुदा नात्यातील सर्व पै–पाहुण्यांना माहित होते. त्यामुळे त्याचे कुठेच लग्न जुळत नव्हते. ...पान २ वर

## जमिनीचा वाद त्याच्या प्राणावर बेतला धाकट्या भावाने थोरल्याचा जीव घेतला

औरंगाबाद : क्राईम रिपोर्टर

ग्रामीण भागात शेती हेच उत्पन्नाचे साधन असल्याने कुणी एक इंचही जमीन कुणाला सोडत नाही. जमिनीवरून झालेल्या वादात रक्ताचे पाट वाहतात. औरंगाबाद मध्ये अशाच एका घटनेत जमिनीच्या वादातून लहान भावाने मोठ्या भावाची हत्या केली. या प्रकरणी आरोपी भावाला अटक करण्यात आली आहे.




वादातून होणाऱ्या छोट्या–मोठ्या वादातून गंभीर घटना घडतांना गेल्या काही दिवसांत अधिकच वाढताना पाहायला मिळत आहे. अशीच काही घटना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील लिहाखेडी येथे समोर आली आहे. जमिनीच्या वादातून मोठा भाऊ आणि लहान भाऊ यांच्यात तीन दिवसांपूर्वी वाद झाला. या वादात लहान भावाने मोठ्या भावाचे गुप्तांग दाबले आणि उचलून पटकले. यामुळे मोठा भाऊ बेशुद्ध झाला होता. मात्र त्याच्या उपचारदरम्यान मुत्यू झाल्याने लहान भावासह चौघाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाबुराव गहेनाजी साखळे (वय ७० वर्षे) असे मयत झालेल्या मोठ्या भावाचे नाव आहे. तर लहान भाऊ भगवान गहेनाजी साखळे, विशाल भगवान साखळे, आकाश भगवान साखळे, सुभद्राबाई भगवानसाखळे (सर्व राहणार लिहाखेडी) यांच्याविरुद्ध अजिंठा ठण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सिल्लोड तालुक्यातील लिहाखेडी येथील गट क्रमांक २७७ आणि २७८ येथे बुधवारी (५ जुलै) रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास मयत बाबूराव आणि त्यांचा भाऊ भगवान यांचे शेतीच्या वादातून भांडण सुरू झाले. यावेळी भगवान याने मयत बाबुराव याचे ...पान ६ वर

पान १ वरून...

## वसई विरार महापालिकेतून भाजपाच्या ...

बहुजन विकास आघाडीचे कार्यकर्ते घराघरात पोहचले. इथल्या भूमिपुत्रांना भाजपापासून कसा धोका आहे हे लोकांना पटवून दिले घरोघरी जाऊन संवाद साधला. बहुजन विकास आघाडीने इथे केलेल्या विविध नागरी सुविधांची लोकांना माहिती दिली. याउलट भाजपाचे कार्यकर्ते मोदी आणि योगीच्या जीवावर भाव खात होते. आम्हाला प्रचाराची गरज नाही 'मोदी हैं तो सब मुमकीन है' असे म्हणत तर आहेच मात्र वसईतील आमदार ही म्हणाले होते की आमच्याकडे लोक कमळ बघून मतदान करतात अशा वसई विरार महापालिका जिंकल्याचा आविर्भावात वावरत होते. त्यातच फडणवीसांच्या सभेमुळे त्यांची आणखी कॉलर टाईट झाली. पण बहुजन विकास आघाडीने त्यांचा टांगा पलटी करून कमलाबाईला चिखला एवजी वसईचा नाल्यात बुडवले. लातूरमध्ये दिवंगत लोकनायक माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या विरोधात बोलणाऱ्या भाजपा प्रदेशाध्यक्षाला लातूरकरांनी त्याची आणि भाजपची औकात दाखवून दिली. विलासरावांनी लातूरला एक उत्तम औद्योगिक शहर बनवले. त्यामुळे तिथल्या हजारो युवकानं रोजगार मिळाला. चांगले रस्ते, उत्तम आरोग्य सेवा, स्वच्छ पिण्याचे पाणी, चांगली परिवहन सेवा दिली आणि मुख्य म्हणजे लातूरचा विकास करताना कुणाचा जात धर्म पाहिला नाही सर्वांना बरोबर घेतले. त्यामुळेच सर्व जाती धर्माच्या लोकांनी एकत्र येऊन भाजपला अद्दल घडवली. भलेही आज विरोधी पक्षांना अपयश आले असले तरी भाजप निवडणूक आयोगाच्या मदतीने निवडणूक जिंकतो हा एक संदेश जनतेत गेला त्याचे परिणाम आज ना उद्या त्यांना भोगायला लागणार आहेत.

वसई विरार महापालिकेत एकंदरीत एकूण मतदान पुरुष ६०११४१ तर महिलांचे पाच लाख २५ हजार ११३ व इतर १४० एकूण मतदार संख्या ११२६४०० एवढी आहे. १५ जानेवारी रोजी झालेले मतदान सकाळी ७.३० ते ५.३०च्या दरम्यान पुरुष तीन लाख ४७ हजार ४७९ महिला दोन लाख ९५ हजार ९२४ व इतर २४ एकूण झालेले मतदान ६,४३,४२७ एवढे मतदान झाले. ५७.१३% एवढे एकूण मतदान झाले. बहुजन विकास आघाडी पक्षातील काही आजी-माजी नगरसेवकांना पराभवाच्या सामना करावा लागला त्यात हार्दिक राऊत ४७३ मते, पंकज भास्कर ठाकूर ६३६, माजी महापौर रुपेश जाधव १४३ तर शिंदेगटाचे सुदेश चौधरी २३२८, धनंजय गावडे २४२३ तर सगळ्यात कमी मताने बहुजन विकास आघाडीच्या उमेदवार काजल गोपाळे यांनी भाजपाचे उमेदवार पुनम बिदलानी यांचा फक्त ९१ पराभव केला. तर बहुजन विकास आघाडीच्या मार्शल लोपीस यांनी भाजपचे चंद्रकांत नारायण वझे यांचा ९३३२ मताने दणदणीत पराभव केला.

## संशयाने शुभम अस्वस्थ झाला...

होऊ नये असे शुभमला वाटत होते. त्यामुळे त्याला जय गोराडे याचा राग येत होता. जय गोराडे याच्या जागी शुभम स्वत:ला बघत होता. तिने जयला स्पर्श केला म्हणजे तिने आपल्यालाच स्पर्श केला असा शुभमला भास होत असे. मात्र भानावर आला म्हणजे शुभम स्वत:वरच चिडत असे. त्यानंतर त्याला जय गोराडे याचा राग येत असे. तिने जय गोराडे याची संगत सोडून आपल्यासोबतच रहावे असे शुभम यास नेहमी वाटत होते. मात्र जय आणी तिची महाविद्यालयीन मैत्री होती. दोघे एकाच महाविद्यालयात,एकाच वर्गात शिकत असल्यामुळे दोघांची मैत्री जमली होती. दोघांचे विचार जुळल्यामुळे दोघे एकेमेकांची साथ सोडण्यास तयार नव्हते. त्याचाच शुभमला राग येत होता. ती तरुणी आपल्या हातून सुटून केवळ जय याची होईल अशी भिती शुभम यास वाटत होती. जय आणी तिचे एकमेकांवर प्रेम असल्याचा संशय शुभम यास येऊ लागला. त्या गैर समजातून एके दिवशी शुभमने जय यास गाठले. तु तिचा नाद सोड, मी तिच्यावर प्रेम करतो. तु जर तिच्यासोबत दिसला तर मी तुला ठार करेन अशी उघड उघड धमकीच शुभमने जय यास दिली. शुभमच्या धमकीने जयच्या जिवाची गाळण झाली होती. अवघा अठरा वर्षाचा साधी मिसरुढ देखील न फुटलेला जय गोराडे हा तरुण मनातून पार घाबरला. त्याने त्याच्या मनातील भिती वडीलांऐवजी काका दिपक गोराडे यांच्या कानावर टाकली. मनातून दुखी: झालेल्या जय याने एके दिवशी त्याच्या काकांची भेट घेतली. त्याच्या चेहऱ्यावर बेचैनी स्पष्ट दिसत होती. काका... शुभम सोनवणे नावाचा तरुण मला त्रास देतो. तो मला शिवीगाळ करतो, चाकू हल्ला करण्याच्या धमक्या देतो अशी तक्रार जय याने त्याच्या काकांजवळ कथन केली. आपल्या पुतण्याच्या मनातील भय काका दिपक गोराडे यांनी ओळखले. त्यांनी जय यास धीर देत शांत केले आणी त्याचे कारण विचारले. मी शिकत असलेल्या महाविद्यालयात एक तरुणी आहे. ती तरुणी माझ्याच वर्गात शिकत असून आम्ही दोघे सोबत असतो. तिच्या घराजवळ शुभम सोनवणे राहतो. त्या तरुणीचे व माझे प्रेमप्रकरण सुरु आहे असा शुभमचा गैरसमज असल्याचे जय याने त्याच्या काकांजवळ कथन केले. त्या गैरसमजातून शुभम मला नेहमी शिवीगाळ व जीवे ठार करण्याची धमकी देत असल्याचा खुलासा जय याने काकांजवळ केला. त्यावेळी काकांनी जय यास त्याच्या मोबाईलद्वारे शुभम यास कॉल लावण्यास सांगितले. शुभम यास कॉल लागल्यानंतर जय याने त्याचे काकांसोबत बोलणे करुन दिले. काका दिपक गोराडे यांनी शुभम सोनवणे यास प्रेमाने समजावून सांगितले की जय आणी त्या तरुणीचे प्रेम संबंध नाही. दोघे एकाच महाविद्यालयात आणी वर्गात शिकत असल्यामुळे दोघे एकमेकांसोबत बोलतात. त्यामुळे त्यांच्यात तसा कसलाही प्रकार नाही. मात्र जयच्या काकांनी समजावल्यानंतर देखील शुभमच्या मनाचे समाधान झाले नाही. त्याच्या मनात जय विषयी आकस होताच. ३१ डिसेंबर २०२५ हा सरत्या वर्षाचा शेवटचा दिवस जयच्या जीवनातील अखेरचा दिवस ठरला. जय याचे काका ३१ डिसेंबर रोजी काही कामानिमीत्त एम. जे. महाविद्यालयात गेले होते. त्यावेळी जय हा शहरातील गोलाणी मार्केट परिसरात आला होता. त्याचवेळी त्याठिकाणी शुभम सोनवणे हा देखील आलेला होता. जय समोर दिसताच शुभम सोनवणे याने त्याला चाकू दाखवला. जय याने घाबरुन त्याच्या काकांना फोन लावला. काका... शुभम सोनवणे हा मला गोलाणी मार्केट परिसरात भेटून त्या तरुणीसोबत प्रेम प्रकरण बंद केले नाही तर मारुन टाकण्याची धमकी देत असल्याचे जय याने त्याच्या काकांना मोबाईलवर सांगितले. त्यावेळी पलीकडून काकांनी त्याला वाद न घालता गुपचूप घरी निघून जाण्यास सांगितले. काही वेळाने पुन्हा जय याने त्याच्या काकांना फोन लावून सांगितले की शुभमने मला अडवले असून तो मला शिवीगाळ करत आहे. शुभमच्या हातात चाकू असल्याचे जय त्याच्या काकांना काकुळतीने सांगत असतांना पलीकडे त्यांना आरडाओरड सुरु असल्याचा आवाज येऊ लागला आणी काही वेळाने कॉल कट झाला. जयच्या काकांना आलेला जयचा तो कॉल शेवटचा ठरला. काकांनी पुतण्या जय यास पुन्हा कॉल केला असता तो त्याने उचलला नाही. त्यामुळे घालमेल झालेल्या अवस्थेत त्याच्या काकांनी एका मित्राच्या सोबतीने गोलाणी मार्केटच्या दिशेने भरधाव वेगात मोटार सायकलने मार्गक्रमण केले. दरम्यानच्या कालावधीत जय आणी शुभम यांच्यात भर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात झटापट सुरु होती. त्याच वेळी महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या निमित्ताने मनपा आवारात धामधुम सुरु होती. त्याचवेळी मनपाच्या मागील बाजूस रस्त्यावर रक्तरंजीत थरार देखील सुरु होता. त्यामुळे गोंधळात एकच भर पडली. दरम्यान जय आणी शुभमच्या वादाने सर्वोच्च पातळी गाठली होती. शुभमने सिने स्टाईल पाठलाग करत जय यास गाठून त्याच्यावर प्राणघातक हल्ला चढवला. जयच्या छातीवर उजव्या बाजुला आणि डाव्या बाजूच्या बरगडीजवळप्राणघातक हल्ला झाल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात जमीनीवर कोसळला होता. नेमक्या त्याचवेळी काही कामानिमीत्त एमआयडीसी पोलिस स्टेशनचे कर्मचारी रमेश चौधरी हे घटनास्थळ परिसरात आले होते. सुरु असलेला रक्तरंजीत थरार बघून अजीबात वेळ न दवडता ते जखमी जयच्या मदतीला धावून गेले. त्यांनी हल्लेखोर शुभमला घट्ट पकडून ठेवले. शिताफीने त्यांनी हल्लेखोर शुभमच्या हातातील धारदार शस्त्र सोडवून घेतले. या घटनेची माहिती मिळताच जळगाव शहर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक सागर शिंपी यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने घटनास्थळ गाठले. एमआयडीसी पोलिस स्टेशनचे पोलिस कर्मचारी रमेश चौधरी यांनी प्रसंगावधान राखत पकडून ठेवलेल्या हल्लेखोर शुभम सोनवणे यास शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. दरम्यान भरधाव वेगात मित्रासोबत आलेल्या जयच्या काकांनी घटनास्थळ गाठले. त्यावेळी त्यांना घटनास्थळ परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी दिसली. त्यावेळी त्यांना त्यांच्या ओळखीचे पोलिस कर्मचारी रमेश चौधरी दिसले. त्यांनी रमेश चौधरी यांना एवढी गर्दी कसली आहे अशी विचारणा केली. त्यावर रमेश चौधरी यांनी त्यांना सर्व घटनाक्रम कथन केला. जखमी जय गोराडे यास रिक्षाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्यावर अति दक्षता विभागात उपचार सुरु करण्यात आले. मात्र त्याची प्रकृती अधिकच बिकट असल्याने त्याला पुढील उपचारासाठी खासगी आयकॉन हॉस्पीटलमधे वर्ग करण्यात आले. अति रक्तस्त्रावामुळे उपचार सुरु असतांना जय गोराडे याचा मृत्यु झाला. डॉक्टरांनी त्याला मयत घोषित केले. मयत जय गोराडे याचे काका दिपक सोनु गोराडे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार जळगाव शहर पोलिस स्टेशनला संशयीत आरोपी शुभम सोनवणे याच्याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गु.र.नं. ४२२/२०२५ भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम १०३(१), १२७ (१), ३५२, ३५१ (२) नुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस निरीक्षक सागर शिंपी यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा पुढील तपास सुरु करण्यात आला. आजच्या तरुणांनी हे लक्षात ठेवायला हव की प्रेमात स्वामित्व नसतंतर विश्वास असतो. गैरसमज हा नेहमीच नात्यांचा मारेकरी ठरतो. संवाद करा, समजून घ्या, थांबा आणि विचार करा. कारण एका चुकीच्या क्षणी घेतलेला निर्णय आयुष्यभराची शिक्षा ठरु शकतो. गैरसमजातून जन्मलेला राग, एक क्षणात एखाद्याचा जीव घेतोपण संवादातून जन्मलेला समजूतदारपणाआयुष्य वाचवतो.



**जळगाव एमआयडीसी पोलिस स्टेशनला कार्यरत असलेले पोलिस कर्मचारी रमेश चौधरी हे काही कामानिमीत्त गोलाणी मार्केट परिसरात आले होते. नेमके त्याच वेळी त्यांना संशयित शुभम सोनवणे हा तरुण जय गोराडे याच्यावर प्राणघातक हल्ला करत असतांना दिसून आला. रक्ताच्या थारोळ्यातील जयचे प्राण वाचवणे गरजेचे होते. क्षणाचाही विलंब न करता रमेश चौधरी यांनी तत्परता दाखवत हल्लेखोर शुभम सोनवणे यास घट्ट पकडून ठेवले आणी शिताफीने त्याच्या हातातील धारदार शस्त्र काढून घेण्यात यश मिळवले. त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.**

## दारूच्या व्यसनात नात्याची होळी ...

आला होता. त्यात त्याचे त्याचे काम ही काही कारणासाठी सुटले होते. त्याचे उतपन्न ही काही होत नव्हते.त्यामुळे तो सैरभैर झाला होता. त्यातच तो दारूच्या व्यसनाच्या आहरी गेला असल्याने त्याला काही सुचत नव्हते. त्याच्याकडे कर्जे भरण्यासाठी बँकांनी आणि बचत गटांनी त्याच्या मागे ससेमिरा लावलेला होता. त्यामुळे तो जास्तच हैरान झालेला होता. त्याला कुणी मदत ही करीत नव्हते. वडिलांच्या निधनानंतर तो वडिलार्जीत घरात राहत होता. त्या घराची ही रितसर वाटणी किंवा हिस्सेवारी झालेली नसल्याने त्याला त्या घरावर कर्जे देखील मिळत नव्हते. ते घर त्याच्या वडिलांच्या निधनानंतर त्याच्या आईच्या नावावर झाले असल्याने तिच्या संमती शिवाय त्याचे काही ही चालत नव्हते. भाऊ जयेश याला सरकारी नोकरी असल्याने त्याचे सर्व काही व्यवस्थीत होते. तो देखील त्याला मदत करीत नव्हता. तसेच तो आईला सांगून घराची वाटणी ही करीत नव्हता या कारणातून उमेश याचे भाऊ जयेश आणि वासंती याच्याबरोबर रोज भांडणे होत होती. उमेश हा आधीच व्यसनाच्या आहरी गेलेला असल्याने त्यातच तो कर्ज बाजारी झाला असल्याने त्याच्या नावावर घर केले तर तो ते घर विकून टाकील अशी भिती वासंती सरमळकर यांना होती.त्यामुळे त्या घराची वाटणी करायला तयार नव्हत्या याचा राग उमेश याला येत होता. कदाचित घराची वाटणी करू नकोस असे आपल्या आईला आपल्या भावाने सांगितले असावे अशी शंका त्याला येत होती. त्यामुळे तो आपल्या आई आणि भावावर जास्तच चिडत होता. आपल्यावरील कर्ज कसे फेडायचे याची त्याला चिंता होती. तो त्या काळजीत होता. कर्ज ही काही थोड थोडके नव्हते. त्याच्या अंगावर सगळीकडील मिळून जवळपास १५ लाखांच्या पुढे कर्ज झाले होते. हे कर्ज फेडण्यासाठी त्याला त्याचे राहते घर विकावे लागणार असल्याने तो आईला आणि भावाला आपल्या नावावर घर करण्यास सांगत होता. परंतु ते दोघे ही त्याच्या नावावर ते घर करीत नव्हते. भावाला चांगली नोकरी आहे त्याला कशाची चिंता नाही मग त्याने गावाकडील राहत्या घराची कशाला आशा करावी असे त्याचे मत होते. या कारणातून त्याने आईला आणि भावाला गळ घातली होती. परंतु ते दोघे त्याचे काही एक ऐकत नव्हते. भाऊ ऐकत नसल्याने तो दारू पिऊन आईकडे तगादा लावीत होता. परंतु त्याची आई ही आपल्या नवऱ्याची ती निशानी असल्याने घर विकायला किंवा उमेशच्या नावावर करण्यास तयार नव्हती. उमेश हा आईला सांगून वैतागलेला होता. तुला माझी काही काळजी नाही, मी कर्जात मरावे का? असे तो तिला विचारत होता. परंतु त्याची आई आणि भाऊ त्याला तु ते कर्ज केले आहेस ते कर्ज तुझे तुलाच फेडावे लागेल असे सांगत होते. आम्ही कुणी तुला यात मदत करणार नाही असे स्पष्टपणे सांगितले होते. त्यामुळे उमेशला काय करावे ते सुचत नव्हते. घरातील भांडणे वाढली होती. या भांडणात तो आपल्या आईला दोष देत होता. ही म्हातारी जिंवतपणी आपल्याला काय देणार नाही, त्यात ती आपल्या भावाचे सगळे काही ऐकत आहे. याचा त्याला राग येत होता. आईला समोर पाहिले की, त्याच्या तळपायाची आग मस्तकात जात होती. आपल्या आईला आपल्या भावाची आणि भावजेयची शिकवण आहे त्यामुळे ती आपले काही ऐकत नाही हे त्याच्या लक्षात आले. अलिकडे त्याच्याकडे बॅकांनी आणि बचत गटांनी कर्ज वसुलीसाठी तगादा लावला असल्याने त्याला यातून काही तरी मार्ग काढायचा होता. परंतु आईने आणि भावाने सहमती किंवा सही केल्या खेरीज त्याला आपल्या वडिलार्जीत घरात काही ही करता येत नव्हते. आईची तर मनधरणी किती वेळा करायची याचा तो विचार करीत होता. कितीला वेळा आईला सांगितले तरी ती त्याचे काही ऐकत नाही म्हणून त्याने आता टोकाचा निर्णय घेतला. मंगळवार दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी त्याची आई वासंती आणि भावजेय जागृती या दोघी आणसुर मडकीलवाडी येथे आपल्या गावी काही कारणास्तव आल्या होत्या. उमेशने आईला आपली अडचण सांगून राहत्या वडिलार्जीत घराबाबत निर्णय घेण्यास सांगून मदत करण्यास सांगितले मला कर्जातून मुक्त व्हायचे आहे. त्यासाठी मला राहते घर विकावे तर लागणार आहे किंवा त्यावर परत कर्ज तरी काढावे लागणार आहे. तु त्यासाठी संमती दे अशी विनवणी त्याने आपल्या आईला केली. परंतु त्यावेळी त्याच्या आईने आणि भावजेयने त्याचे काही एक म्हणणे ऐकले नाही. उलट त्यांनी उमेशलाच चार शब्द सुनावत खडे बोल सुनावले. याचा त्याला राग आला. दुसऱ्या दिवशी परत त्याने तोच विषय आपल्या आई समोर मांडला परंतु त्यावेळी ही तिचा नकारच आल्याने त्याने आता वेगळाच विचार केला. बुधवार दिनांक १४ जानेवारी २०२६ रोजी त्याची आई घरासमोरील अंगणात रात्री ८.३० वाजणेच्या सुमारास आराम खुर्चीत रेलून बसल्या होत्या. त्या कशाच्या तरी तंद्रीत डोळे झाकून विचार करीत होत्या. त्याचवेळी उमेश हा दारूच्या नशेत घराकडे आला. आपल्या आईला खुर्चीत आराम करीत असल्याचे बघून त्याची तळपायाची आग मस्तकात गेली. रागाने बघत तो तिच्याकडे पाहत आपण राहत असलेल्या वरच्या मजल्यावर गेला. त्याने घरातील कपाटातून आपली बंदुक घेतली आणि वरच्या मजल्यावर उभा राहून त्याने त्याच बंदुकीतून आपल्या आईवर गोळी झाडली. ती गोळी आराम खुर्चीत बसलेल्या वासंती याच्या डाव्या छातीत खुसली. त्याच्या छातीतून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होऊ लागला. छातीत गोळी घसल्याने त्या ओरडत खुर्चीवरून खाली पडल्या. त्याच्या ओरडण्याच्या आवाजाने आणि बंदुकीच्या गोळीच्या आवाजाने घरात असलेली त्याची सुन जागृती या घराबाहेर ओरडत आल्या. त्यांनी वरती पाहिले तर दीर उमेश याच्या हातात बंदुक होती. त्या काय समजायचे त्या समजल्या. आपल्या सासुच्या छातीवर गोळी लागल्याचे बघून त्या ही धायमोकलून रडू लागल्या. त्यांनी आरडा ओरडा करून शेजाऱ्यांना बोलावून घेतले. या घटनेची माहिती शेजारी ही धावत घटनास्थळी आले. घटनास्थळी खुर्चीवरून वासंती सरमळकर या खाली पडल्या होत्या. त्यांचा जागीच मृत्यु झाला होता. जागृती यांनी या घटनेची माहिती वेंगुर्ला येथील आपला पती जयेश सरमळकर यांना दिली. या घटनेची माहिती मिळताच जयेश हे ही तातडीने आणसुर मडकीलवाडी येथे आले. कुणी तरी तोपर्यत या घटनेची माहिती वेंगुर्ला पोलिसांना दिली होती. या घटनेची माहिती मिळताच वेंगुर्ला पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी या घटनेचा पंचनामा करून या घटनेची माहिती जागृती सरमळकर याच्याकडून घेतली. पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह वेंगुर्ला येथील सरकारी रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवून दिला. हि घटना कोणत्या कारणातून घडली आहे आणि या घटनेतील संशयीत आरोपी कोण आहे याची माहिती पोलिसांना झाली असल्याने त्यांनी राहत्या घरातून उमेश सरमळकर याला ताब्यात घेऊन त्याला वेंगुर्ला पोलीस स्टेशनला आणले. त्याच्याकडे पोलीस या घटनेची चौकशी करीत असतानात त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्याने पोलीसांनी या घटनेची लेखी फिर्याद जागृती जयेश सरमळकर (वय ३५) रा.वेंगुर्ला याचेकडून घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी वासंती वासुदेव सरमळकर (वय ६५) रा.आणसुर मडकीलवाडी वेंगुर्ला याच्या खुन प्रकरणी त्याचा मुलगा उमेश वासुदेव सरमळकर (वय ४०) रा.आणसुर मडकीलवाडी वेंगुर्ला याच्या विरोधात आयपीसी कलम १०३ (१),(५) प्रमाणे गुन्हा दाखल केला. गुरूवार दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी त्याला वेंगुर्ला येथील कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने उमेश सरमळकर याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली बंदुक जप्त केली. या घटनेचा पुढील तपास वेंगुर्ला पोलीस करीत आहेत.

## समलिंगी नात्यात दुरावा आला...

वाढत गेला आणि दोघात मारामारी झाली. त्यात नितेश याच्या हल्लयात अमोल पवार याचा मृत्यू झाला. घटनेच्या दिवशी रात्री नितेश अमोल हा बाहेरुन जेवण घेऊन आला होता. या दरम्यान वाद वाढत गेला. रागात येऊन नितेश याने बांबूने अमोल यांच्या डोक्यावर आणि चेहऱ्यावर अनेक वार केला. ज्यामुळे जागेवरच त्याचा मृत्यू झाला. शुक्रवारी सकाळी नितेश घरातून बाहेर पडून ओरडायला लागला की अमोल निपचित पडला असून त्याचा मृत्यू झाला. त्याचा आवाज ऐकून शेजारी जमा झाले आणि त्यांनी पोलिसांनी कळवले. सिव्हील लाईन पोलिस जागेवर पोहचली आणि त्यांनी तपास सुरु केला. पोलिसांनी सांगितले की अमोल याच्या शरीरावर गंभीर जखमांच्या खूणा आहेत. चौकशीत आरोपीने गुन्हा कबूल केला आहे. अमोल याच्या मृत्यूचे नेमके कारण पोस्टमार्टेम रिपोर्टमधून बाहेर येईल असे म्हटले जात आहे. त्यांच्यातील नात्यासंदर्भातही चर्चा सुरु आहेत. त्या संदर्भात पोलिसांकडे सध्या कोणतीही माहिती नाही. चौकशीतून सत्य बाहेर येईल असे म्हटले जात आहे.

## दारूने दिलीपचा घात केला...

लग्न झाले नसल्याने तो ऐतखाऊच बनला होता. मनात आले तरच तो कामावर जात होता. नाही तर कुठे तरी बसुन मित्रांच्या बरोबर दारू पिण्यातच वेळ घालवायचा. त्याला एक वाईट सवय होती. दारूच्या नशेत तो समोरच्याला शिव्या देवून मीच मोठा म्हणत बाता लावायचा. त्याच्या या वागणुकीमुळे त्याचे मित्र ही वैतागलेले होते. त्याचे जवळचे मित्र भगवान शेळके आणि अनिरूध्द चाणंग हे त्याच्या या सवयीला कंटाळलेले होते. ते सुरज बरोबर सहसा दारू प्यायला बसत नव्हते. त्यांना सुरजची सवय माहित होती. दारूच्या नशेत सुरज हा मित्रांच्या बरोबर वाद घालत भांडण आपल्यावर ओढून घेत होता. त्या भांडणात बऱ्याचदा त्यांच्यात भांडणे मारामारी ही झाली होती. समज देवून ही सुरज हा काही कोणाचे एक ऐकत नव्हता. सुरजच्या दारूच्या व्यसनाला त्याची आई ही कंटाळेलेली होती. तिने त्याला दारू सोड, चांगले वाग, मी तुला नात्यातील चांगली मुलगी बघते, तुझे लग्न लावून देते असे सांगत होती. परंतु सुरजला दारू प्यायला मिळाली नाही की, त्याचे हात थरथर कापत असायचे. त्यामुळे तो सकाळी सकाळी उतारा घेतला की, त्याचा दिवस सुरू व्हायचा मग रात्री पर्यत तो दारूच्या नशेत राहयचा. दारू पिण्यासाठी लागणारे पैसे तो कधी कधी मित्रांच्या खिशात आपला हात घालून काढून घ्यायचा. त्यामुळे त्याचे मित्र त्याला बघितले की आपला रस्ता बदलत होते. दारू पिल्यामुळे त्याच्या शरीरावरील नियंत्रण राहत नव्हते. तो कायम रस्त्यावर हलत डुलत येत असायचा. त्याची ओळख ही गावात पिंडका सुरज अशीच झाली होती. त्याच्या तोंडातील शिव्या ऐकून आया बाया ही खाली मान घालत होत्या. भगवान शेळके आणि अनिरूध्द चांगण हे त्याचे मित्र ही त्याला टाळत होते. परंतु चुकून जरी ते सुरजला भेटले तरी सुरज हा त्याचा पिच्छा सोडत नव्हता. भगवान आणि अनिरूध्द यांना ही दारू पिण्याची सवय होती, ते ही लोणंद शहरातील एका ठराविक देशी दारूच्या दुकानात दारू पिण्यासाठी जात होते ही गोष्ट सुरजला माहित होती. आपल्याकडे दारू पिण्यासाठी पैसे नसले की सुरज त्याचा शोध घेत त्या दारूच्या दुकानात जात होता. तेथे ते दोघे त्याला भेटले की, सुरज हा त्याच्याकडून दारूसाठी पैसे घेत होता.त्यांनी त्याला पैसे दिले नाहीत की मग तो त्याच्याकडून दारू तरी घेऊन पित होता. त्यामुळे सुरज हा दिसला की, ते दोघे त्याला शिव्या दयायचे आला बघ, असे म्हणत ते त्याला त्याच्या आईवरून शिव्या दयायचे. त्याच्या शिव्या तो खायचा पण त्याच्याकडून दारू पिल्या शिवाय तो त्यांना सोडत नव्हता.त्याच्या या सवयीमुळे त्याच्यात बऱ्याचदा भांडणे वादा वादी ही झाली होती. त्याची ही भांडणे खरे तर नित्याचीच होती. दारू पिण्यासाठी बसले की कशावरून तरी वाद उकरून काढायचा आणि एकमेकांना शिव्या घालत बसायचे एवढाच त्याचा उदयोग बनला होता. शनिवार दि.१० जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सात वाजणेच्या सुमारास शहरातील एका देशी दारूच्या दुकानात सुरज हा दारू प्यायला गेला.त्यावेळी तेथे आधीच भगवान शेळके आणि अनिरूध्द चांणग हे दारू पित बसले होते. त्यांना पाहून सुरज त्याच्या जवळ गेला. मला एक क्वाटर सांग असे तो भगवानला म्हणाला, त्यावर भगवान याने फुकटया आय घाल्या, तुला कितीवेळा आम्ही दारू दयायची रे जरा मनाची नाही तर जनाची लाज बाळग, फुकट दारू प्यायला मागू नकोस आता दारूच्या किमंती ही वाढल्या आहेत तुला फुकट दारू प्यायला दयायला परवडत नाही असे म्हणून ते दोघे सुरजच्या समोर दारू प्यायला बसले. सुरजच्या खिशात दारूसाठी पैसे नव्हते. तो त्यांना गयावया करीत मला क्वाटर दया रे म्हणत होता. त्यात त्याने सकाळ पासून जास्तच घेतली असल्याने त्याची नशा ही त्याला होती त्या नशेतच तो परत दारू पिण्यासाठी दारू दुकानात आला होता. तेथे दारू पिणाऱ्या भगवान शेळके आणि अनिरूध्द चांणग याच्यासोबत त्याची वादा वादी सुरू झाली. त्यात तो ही त्या दोघांना शिव्या घालू लागला. बघता बघता दारू दुकानात राडा सुरू झाला. सुरजने आपल्याला आईवरून शिव्या दिल्याने भगवान हा त्याच्यावर चिडला होता. तो रागाच्या भरात त्याला मारायला गेला. तो ही त्याला त्याच्या आईवरून शिव्या देत त्याच्या अंगावर गेला. बाजुलाच पडलेली पीव्हीसी पाईप त्याने उचलली त्या पाईपने त्याने सुरजला बदडायला सुरूवात केली. सुरजला त्या दोघांनी दारू दुकानाच्या बाहेर ओढत आणले. त्याला लाथा बुक्क्यांनी मारहाण करीत त्याची चांगलीच धुलाई केली. ते दोघे त्याला मारहाण करीत असताना भगवान शेळके याच्या दोघा तिघा मित्रांनी ही त्यांना मदत केली. ते ही वाहत्या गंगेत हात धुवून घेत त्यांनी ही सुरजची चांगलीच धुलाई केली. त्यांनी केलेल्या मारहाणीत सुरज हा रक्तबंबाळ अवस्थेत रस्त्यात पडला होता.त्याला त्याच अवस्थेत भगवान आणि अनिरूध्द यांनी त्याला आपल्या बाईकवर मध्ये बसविले आणि त्याला रेल्वे स्टेशनच्या परिसरात नेवून टाकले त्यानंतर तेथून ते पाच जण फरारी झाले. सुरजला त्यांनी जबर मारहाण केल्याने त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात अतिरक्तस्त्राव सुरू झाल्याने त्याची हालचाल मंदावली होती. त्याला त्याच अवस्थेत टाकून मारेकऱ्यांनी तेथून पोबारा केला. या घटनेची माहिती लोणंद ग्रामीण पोलीस स्टेशनला कुणी तरी दिल्याने या घटनेची माहिती पोलीसांना मिळाली. ते तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पो.निरी. शिवाजी जायपत्रे हे आपल्या सहकार्यासह घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी पडलेल्या तरूणाची ओळख पोलीसांनी सुरज जाधव अशी पटवली. तो गंभीर जखमी अवस्थेत असल्याने पोलीसांनी त्याला तातडीने लोणंद शहरातील एका खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. त्याची गंभीर अवस्था बघून तेथील डॉक्टरांनी त्याच्यावर प्राथमीक उपचार करून त्याला पुढील उपाचारासाठी सातारा येथील सिव्हील हॉस्पिटल येथे दाखल करण्यास नातेवाईकांना सांगितले. तेथे त्याच्यावर उपचार सुरू असताना सुरज जाधव याचा दुसऱ्या दिवशी मृत्यु झाला.या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस उपअधिक्षक विशाल खांबे यांनी भेट देवून या घटनेची माहिती घेतली. पोलीसांना मयत सुरज जाधव हा गंभीर जखमी अवस्थेतील मृतदेह रेल्वे स्थानकच्या परिसरात मिळाला असल्याने तेथील सीसीटीव्ही फुटेज पोलीसांना तपासले असता त्या फुटेज मध्ये पाच सहा जण मिळून सुरज जाधव याला ओढून आणत असल्याचे दिसत होते. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना सुरज जाधव हा शहरातील एका देशी दारूच्या दुकानात दारू पिण्यासाठी बसला होता. त्या ठिकाणी त्याची त्याचे मित्र भगवान शेळके आणि अनिरूध्द चांणग याच्याबरोबर वाद झाल्याची माहिती पोलीसांना मिळाली. यावरून पोलीसांनी अनिरूध्द चाणंग याला लोणंद येथील सुंदर पॅलेस येथून तर भगवान शेळके याला खंडाळा तालुक्यातील पानमळा निंबोडी येथून ताब्यात घेतले. त्यांना पोलीसांनी लोणंद ग्रामीण पोलीस स्टेशनला आणून त्यांच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा मान्य करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. त्यांनी आपल्या गुन्हयाची कबुली दिल्याने पोलीसांनी या घटनेची फिर्याद मयत सुरज जाधव याची आई सुनंदा दिलीप जाधव (वय ५१) रा.शास्त्री चौक लोणंद यांच्याकडून घेतली.त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी सुरज दिलीप जाधव (३०) रा.शास्त्री चौक, लोणंद यांच्या खुन प्रकरणी भगवान श्रीरंग शेळके (२८) रा.निबोंडी पानमळा तालुका खंडाळा आणि अनिरूध्द पुरूषोत्तम चांगण (२२) रा.सुंदर पॅलेस लोणंद आणि त्याच्या इतर तिघा मित्राच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. पोलीसांनी या दोघांना लोणंद येथील कोर्टासमोर हजर केले.मा.कोर्टाने त्यांना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी भगवान शेळके याच्या कडून गुन्हयात वापरलेली पीव्हीसी पाईप जप्त केली.या घटनेतील इतर तिघा जणांचा पोलीस शोध घेत आहेत. या घटनेचा पुढील तपास पो.निरी.शिवाजी जयपात्रे याच्या मार्गदर्शनाखाली पोली करीत आहेत.

# अयोग्य आहार हेच आजारांचे मूळ -बी.व्ही.चव्हाण

## जैन हिल्स येथे पाच दिवसीय नवीन आहार पद्धती शिबिरास प्रारंभ




**जळगाव : वार्ताहर**

येथील जैन हिल्स येथे आधुनिक जीवनशैलीत वाढत चाललेल्या आजारांवर उपाय म्हणून पाच दिवसीय (आरोग्य संवर्धन शिबीर) नवीन आहार पद्धती व रोगनिदान शिबिराचा शुभारंभ झाला. बडी हंडा सभागृहात झालेल्या उद्घाटन सोहळ्यात उपस्थित मान्यवरांनी योग्य आहार पद्धती स्वीकारल्यास अनेक व्याधी मुळातून दूर होऊ शकतात, असा ठाम संदेश मार्गदर्शक बी.व्ही. चव्हाण यांनी दिला. शिबिराचे औपचारिक उद्घाटन जैन फार्म फ्रेश फुड्सचे वरिष्ठ अधिकारी सुनील गुप्ता, हरिद्वारचे महामंडलेश्वर गिरीधर गिरी महाराज, कानळदा कण्व आश्रमचे अद्वैतानंद सरस्वती महाराज आणि मार्गदर्शक बी. व्ही. चव्हाण यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. आरंभी दीपक चांदोरकर यांनी गुरुवंदना सादर केली तर सरोज चव्हाण यांनी ईशप्रार्थना घेतली. सूत्रसंचालन डॉ. मोनिका भावसार यांनी केले. या शिबिराचे आयोजन जैन इरिगेशनचे सहकारी तसेच शहरातील मान्यवरांसाठी करण्यात आले आहे. कार्यक्रमाची रुपरेषा देऊन त्यासंदर्भाच्या महत्त्वाच्या सूचना कंपनीचे सहकारी सुचेत जैन केल्या. उद्घाटनानंतर मार्गदर्शक बी. व्ही. चव्हाण यांनी आपल्या जीवनातील संघर्षमय अनुभव कथन करताना उपस्थितांना अंतर्मुख केले. लहानपणापासून मला पोटाचे तीव्र विकार होते. सर्व प्रकारच्या पॅथी, उपचार करूनही फरक पडला नाही. वयाच्या ४५व्या वर्षी आजाराला कंटाळून आत्महत्येचा विचार मनात आला. मात्र त्याच वेळी मी न्यू डायट सिस्टीम' स्वीकारली आणि हळूहळू पोटाचा आजार पूर्णपणे बरा झाला, असे त्यांनी सांगितले. आज वयाची ८० वर्षे पूर्ण करूनही ते देशविदेशात फिरून या विषयावर मार्गदर्शन करत आहेत. रामायण–महाभारत काळातील अन्नसेवनाचा उल्लेख करताना त्यांनी कंद, मूळ, फळ, फुले, पाने, हवा, प्रकाश आणि आकाश हे नऊ घटक मानवी आरोग्यासाठी महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट केले. पेट्रोलच्या गाडीत डिझेल भरले तर इंजिन बिघडतेच; त्याचप्रमाणे शरीराला न शोभणारा, अयोग्य आहार घेतला तर आजार अटळ आहेत, असे प्रभावी उदाहरण देत त्यांनी आहार हेच आरोग्य आणि चुकीचा आहार हेच 'अनारोग्य' हे सूत्र मांडले.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडुन निवडणूक लढविण्यासाठी ईच्छुकांची तुफान गर्दी

## माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या उपस्थितीत ईच्छुकांच्या मुलाखती

**देवणी : शकील मनियार**



जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ईच्छुक उमेदवारांची मुलाखत माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. यावेळी ईच्छुक उमेदवारांची तुफान गर्दी होती. यावेळी जिल्हा परिषद गट वाढवणा बु., तोगरी, सोमनाथपुर, लोहारा, निडेबन, नळगीर, हेर या गटातुन अनेकांनी मागणी केली आहे तर पंचायत समिती गण वाढवणा बु., हंडरगुळी, तोगरी, दावणगाव, सोमनाथपुर, गुडसुर, लोहारा, कुमठा, निडेबन, शिरोळ, नळगीर, नागलगाव, हेर, देवर्जन गणातुन शेकडो कार्यकर्त्यांनी निवडणूक लढविण्यासाठी इच्छा व्यक्त केली आहे. यावेळी प्रा.शाम डावळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, कार्याध्यक्ष वसंत पाटील, शिवाजी माने, नरसिंग कंदले, आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थित कार्यकर्ते व निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारांना आमदार संजय बनसोडे यांनी संबोधित करताना म्हणाले की, ही निवडणूक सर्वसामान्य घटकाला व ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाला सोयीसुविधा पुरविण्यासाठी असून आपला येणारा लोकप्रतिनिधी हा जनतेचा सेवक म्हणून काम करणारा व जनतेच्या मनातला असावा अशी अपेक्षा व्यक्त करुन प्रत्येक जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातून जनतेच्या मागणीनुसार उमेदवारी देऊन एक सक्षम प्रतिनिधी निवडून आणणार असल्याचे ग्वाही आमदार संजय बनसोडे यांनी उपस्थितांना दिली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शब ए मेहराज निमित्त इक्राम मस्जिद येथे सालाणा जलसा संपन्न



**देवणी : वार्ताहर**

शब ए मेहराज म्हणजे अरोहनाची रात्र, या रात्री आल्लाहने पैगंबर मुहम्मद यांना मक्का ते जेरुसलेम असा रात्रीचा प्रवास घडवून आणला आणि त्यांना स्वर्गात नेले, जिथे त्यांची अल्लाहशी भेट झाली. हा दिवस इस्लामिक धर्मात खूप महत्वाचा मानला जातो, आणि या रात्री विशेष प्रार्थना (इबादत) केली जाते, हा दिवस इस्लामिक कॅलेंडरमधील रजब महिन्याच्या २७व्या रात्री साजरा होतो. याचेच औचित्य साधत देवणी शहरातील इक्राम मस्जिद येथे सलाना जलसा चे आयोजन करण्यात आले होते. या सालाणा जलसात हजरत अनस बिन मलिक मदरसा देवनी येथील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून कुरणा मधील सखोल माहिती सांगितली. नमाज पठण विषयी माहिती सांगितली. समाजात वावरताना कसे वागावे चांगल्याच गोष्टीचे आचरण करावे या विषयी प्रवचना द्वारे विद्यार्थ्यांनी सांगितले. यावेळी मस्जिद कमिटीच्या वतीने विद्यार्थ्यांना वही, पेन चे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जूहेब ऊंटवाले, इकराम ऊंटवाले, मौलाना हिफजुर्रहमान मौलाना आजम साब, साजिद शेख, मुजीब शेख, गुलामरसुल शेख रऊफ वस्ताद मोमिन यांनी प्रयत्न केले तर यावेळी मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंगणी शिवारात जन्मदात्या बापानेच चिमुकल्यांचा घेतला जीव

**सोलापूर : इरप्पा बोरीकरजगी**





करमाळा तालुक्यातील हिंगणी शिवारात एका बापानेच आपल्याच पोटच्या दोन चिमुकल्यांना विहिरीत ढकलून देऊन त्यांचा खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण करमाळा तालुक्यासह केत्तुर गावावर शोककळा पसरली आहे. केत्तुर येथील रहिवासी असलेल्या सुहास जाधव याने शनिवारी सात वर्षाचा मुलगा शिवांश आणि मुलगी श्रेया या दोन जुळ्या चिमुकल्यांचा हिंगणी शिवारातील रेल्वे पुलाजवळ असलेल्या स्वतःच्या शेतात नेले तेथे त्याने दोघांनाही विहिरीत ढकलून दिले धक्कादायक बाब म्हणजे मुलांना विहिरीत ढकलल्यानंतर काही वेळ थांबल्यानंतर त्याने स्वतःच या कृत्याची माहिती फोन करून इतरांना दिली आणि घटनास्थळावरून तो फरार झाला. दरम्यान घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी आणि ग्रामस्थांनी विहिरीकडे धाव घेतले मात्र तोपर्यंत बराच उशीर झाला होता. केत्तुर येथील स्थानिक मच्छीमार बांधवांनी तातडीने विहिरीत उतरून शोध मोहीम राबवली आणि दुपारी दोन्ही चिमुकल्यांचे मृतदेह बाहेर काढले दोन निष्पाप जीवांचा अशा प्रकारे अंत झाल्याने परिसरात संताप आणि हळहळ व्यक्त होत आहे. वडिलांनी इतके टोकाचे पाऊल का उचलले त्याचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. करमाळा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पुढील प्रक्रिया सुरू केली होती या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस प्रशासन करीत आहे.

# विहिरीतून मोटार काढताना विजेच्या धक्क्याने बाप लेकासह चौघांचा मृत्यू

**सोलापूर : इरप्पा बोरीकरजगी**

उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथे शेतातील विहिरीत असलेली पाणबुडी मोटर क्रेन ने काढत असताना विजेच्या जोरदार धक्का लागून चार जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथे शनिवारी दुपारच्या सुमारास ही घटना घडली या घटनेमुळे मृत्यू पावलेल्या मृतांमध्ये बाप लेकासह दोन मजुरांचा समावेश आहे. या घटनेमुळे केशेगाव आणि परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. कासिम कोंडीबा फुलारी (५४), रतन कासिम फुलारी (१६), रामलिंग साखरे (३०), नागनाथ साखरे (५५) अशी मृतांची नावे आहेत. केशेगाव येथे गणपती देवप्पा साखरे यांच्या शेतात शनिवारी दुपारी विहिरीवरील काम सुरू होते. विहिरीतील पाणबुडी मोटर क्रेनच्या साह्याने बाहेर काढण्याचा प्रयत्न केला जात होता. पाणबुडी मोटार बाहेर काढत असताना अचानक क्रेन गरजेपेक्षा जास्त उंच उचलण्यात आली परिणामी वरून जात असलेल्या विद्युत तारांना त्याच वेळी क्रेनचा वरील भाग चिकटला क्रेनच्या तारांना स्पर्श होतात तारा मधील विद्युत प्रवाह मध्ये उतरला



शेतातून जाणाऱ्या महावितरणच्या तारांमधील विद्युत प्रवाहाचा जोरदार झटका क्रेनला बसला. त्याचवेळी क्रेनच्या संपर्कात असलेल्या आणि विहिरीत काम करीत असलेल्या चौघांना विजेचा जोरदार धक्का बसला. हा धक्का इतका जोराचा होता की चौघांची ही जागेवरच मृत्यू झाला. या दुर्घटनेत बाप लेकांसह कामासाठी आलेल्या दोन मजुरांचा समावेश आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला एकाच वेळी काळाने चार जणांवर झडप घातल्याने केशेगाव परिसरात दुःखाचे संकट कोसळलेले आहे.

# देवणी तालुक्यातील कार्डधारकास दोन ते तीन किलो रेशन कमी देत असले बाबतची तक्रार

**देवणी : वार्ताहर**



केंद्र शासना मार्फत गोरगरिबांना दिले जाणारे मोफत रेशन देवणी तालुक्यातील लाभार्थ्यांना प्रत्येक कार्ड मागे दोन ते तीन किलो रेशन कमी दिले जात असल्याची तक्रार रिपब्लिकन सेनेचे लातूर जिल्हाध्यक्ष प्राध्यापक नर्सिंग सूर्यवंशी आनंदवाडीकर यांनी देवणी तहसीलदारांकडे रीतसर तक्रार केली आहे. प्रत्येक कार्डधारकास दोन ते तीन किलो रेशन कमी मिळत आहे. कार्डधारकांनी याबाबत स्वस्त धान्य दुकानदार यांना विचारणा केली असता ते म्हणतात की गोडाऊन मधून रेशन देताना आम्हाला ५० किलोचा कट्टा असून त्यात ४७ किलो रेशन मिळतो मग आम्ही पूर्ण रेशन कसा देणार असे उत्तर दिले जात आहे, तरी गोडाऊन मधून प्रत्येक कट्ट्या मागे दोन ते तीन किलो कमी केलेला माल हा काळया बाजारात विक्री केले जात आहे. या भ्रष्टाचारात तहसीलदार यांचा हात आहे का असे लाभधारकातून बोलले जात आहे. भ्रष्टाचार त्वरित थांबावावा व प्रत्येक लाभधारकास त्यांना मिळणारे पूर्ण धान्य देण्यात यावे अन्यथा सनदशीर मार्गाने आंदोलन करण्यात येईल अशी मागणी रिपब्लिकन सेनेचे लातूर जिल्हाध्यक्ष प्राध्यापक नर्सिंग सूर्यवंशी आनंदवाडीकर यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.


**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार, जि. पालघर ४०१ ६०३**

web. http://mahatenders.gov.in, email. jawhar.ee@mahapwd.com

**ई–निविदा सूचना क्रमांक २२ सन २०२५–२६**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार जिल्हा पालघर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून निविदेमधील सर्व अटी शर्तींची पुर्तता करणाऱ्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामांकरीता 'बी–१' नमुन्यातील ई–निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, जव्हार यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची मुळ किंमत रु. लक्ष | इसारा रक्कम रुपये | नोंदणी वर्ग | ई–निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | लेखाशीर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मोखाडा खोडाळा विहिगाव रस्ता रा.मा.७८च्या दोन्ही बाजूंना, कि.मी. ०/००० ते ३७/००० पर्यंत (वृक्षारोपण कि.मी. ५/५०० ते ७/७००) ता. मोखाडा, जि. पालघर येथे वृक्षारोपण करणे आणि त्यांची ०३ वर्षांसाठी देखभाल व संगोपन करणे. | १२,६८,८०९.०० | १३,०००.०० | वर्ग ६ व व त्यावरील | रु.५००/– + १८% जीएसटी रु.९०/– एकूण – ५९०/– | १८० दिवस (पावसाळा व सार्वजनिक सुट्ट्या धरून) | ५०५४ वृक्षारोपन व वृक्ष संवर्धन – ५०५४०५८१–५० |
| २. | पतंगशहा कुटीर रुग्णालय जव्हार येथील डायलेसिस विभागातील पत्रे बसविणे व विस्तारीकरणाचे काम करणे. ता. जव्हार, जि. पालघर | १४,१९,७४८.०० | १५,०००.०० | वर्ग ६ व त्यावरील | रु.५००/– + १८% जीएसटी रु.९०/– एकूण – ५९०/– | १८० दिवस (पावसाळा धरून) | ४२१० रुग्णालयांचे बांधकाम विस्तारीकरण देखभाल दुरुस्ती ४२१०३६४१–५३ |
| ३. | पतंगशहा कुटीर रुग्णालय जव्हार येथील प्रयोगशाळा क्ष किरण विभागातील पत्रे बसविणे व विस्तारीकरणाचे काम करणे. ता. जव्हार, जि. पालघर | १४,५३,०५३.०० | १५,०००.०० | वर्ग ६ व त्यावरील | रु.५००/– + १८% जीएसटी रु.९०/– एकूण – ५९०/– | १८० दिवस (पावसाळा धरून) | ४२१० रुग्णालयांचे बांधकाम विस्तारीकरण देखभाल दुरुस्ती ४२१०३६४१–५३ |
| ४. | पोलीस स्टेशन मोखाडा (मुख्य इमारत) येथे दुरुस्ती व नुतनीकरण करणे. ता. मोखाडा, जि. पालघर | २९,२१,४७७.०० | ३०,०००.०० | वर्ग ५–अ व त्यावरील | रु.५००/– + १८% जीएसटी रु.९०/– एकूण – ५९०/– | १८० दिवस (पावसाळा धरून) | ४२२५ अनुसुचित जाती अनुसुचित जमाती – ४२२५१५५७–५३ मोठी बांधकामे (फेर निविदा दुसरी वेळ) |

**ई–निविदा उपलब्ध कालावधी – दिनांक : १९/०१/२०२६ ते दिनांक : २६/०१/२०२६ पर्यंत**
**ई–निविदा उघडणे (शक्य झाल्या) – दिनांक : २७/०१/२०२६ (११.०० वा. शक्य झाल्यास)**

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, जव्हार यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टिप : –

१. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई–निविदा प्रणालीच्या http://mahatenders.gov.in

२. निविदाकारांनी वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व DSC डिजटल प्रमाणपत्र वितरीत व Portal वर Enrollment करण्यासंदर्भात काही शंका/ अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.180030702232
E Mail : eproc.maharashtra@gmail.com, cppp-support@nic.in

३. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा/बयाणा रक्कम, ई–निविदा संचाची किंमत याबाबतचे दस्तऐवजाच्या मूळ प्रती स्वतःच्या नावाची गोपनीयता बाळगून ई–निविदा वेळपत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा ई–निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

४. शासन निर्णयानुसार निम्नतम निविदाकाराचा (L-1) कमी दराबाबतचा (Performance Security)चा DD/FDR/BG लिफाफा क्र. २ (Financial Bid) उघडल्याच्या दिनांकापासून ८ (आठ) दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करण्यात यावा. सादर न केल्यास निम्नतम निविदाकारांची (L-1) इसारा रक्कम (EMD) शासन जमा करण्यात येईल व द्वितीय निम्नतम निविदाकारास (L-2) काम देण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५. इतर अटी व शर्ती ई–निविदेमध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

६. वरील कामांची ई–निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या इंटरनेटवरील वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**जा.क्र./सा.बां./जव्हार/निविदा/६१/२०२६**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार
जिल्हा पालघर पिनकोड ४०१ ६०३
दिनांक : ०७/०१/२०२६

**सही/–**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम, विभाग**
**जव्हार, जि. पालघर**

**विमाका/कोवि/२०२५–२०२६/२७६**

19 TO 25 JANUARY 2026 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 1/17/2026 10:10 PM Page 1



# अपेक्षित निकाल!

जिसकी लाठी उसकी भैस! अशी एक म्हण आहे आणि ती खरीच आहे. कारण ज्याच्या हातात सत्ता आणि अधिकारी असतात त्याच्यासाठी काहीच कठीण नसते. त्यामुळे विधानसभे पाठोपाठ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ज्या निवडणुका झाल्या त्यांचे निकाल अपेक्षितच होते. खरे तर निवडणुकीनंतर निकाल कसा असेल हे ठाऊक असतानाही विरोधी पक्षांच्या लोकांनी आणि मतदारांनीही निवडणूक प्रक्रियेत कसा आणि का भाग घेतला ते कळत नाही. त्यामुळे निकालानंतर निवडणूक आयोगाच्या मदतीने सत्ता काबीज करणाऱ्यांना आणि निवडणूक आयोगाला सुधा दोष देवू नये. आता फक्त यापुढे निवडणुका लढवायच्या की नाहीत याचा विचार करावा. या निवडणुकीत भलेही सत्तेच्या जोरावर काही महापालिका ताब्यात घेण्यात भाजपला यश आले असले तरी काही ठिकाणी मात्र स्थानिक भूमिपुत्रांच्या कडव्या संघर्षासमोर त्यांना हार मानावी लागली आणि त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे वसई विरार महानगर पालिकेचा निकाल! या ठिकाणी भाजपाचे दोन आमदार असतानाही बहुजन विकास आघाडीने त्यांना धूळ चारून आपली सत्ता राखली. त्याचबरोबर भिवंडी, चंद्रपूर, मालेगाव, परभणी, लातूर या महापालिकांमध्ये भाजपला यश मिळाले नाही. कदाचितव तेथे निवडणूक आयोगाला पुरेसा वेळ मिळाला नसेल. या निवडणुकीत ठाकरे बंधूंचे अपयश हा मराठी माणसांसाठी चिंतेचा विषय आहे. आणि त्याचे मुख्य कारण मराठीच्या विरोधात सर्व परप्रांतीय एकवटले. त्यामुळे यापुढे मुंबईत येणाऱ्या परप्रांतीयांच्या लोंढ्यांबाबत इथल्या स्थानिक लोकांना गांभीर्याने विचार करावा लागेल. खास करून मीरा भाईंदरवमहापालके निकाल भयंकर आहे. तिथला निकाल पाहता मीरा भाईंदर महाराष्ट्रात आहे गुजरात्वमधे ते कळत नाही. तिथे परप्रांतीय गुजराती मारवाड्यानी मराठी माणसाचे अक्षरशः पानिपत केले. पण मुंबईत ठाकरे बंधू आणि मराठी माणसांची झालेली पिछेहाट वेदनादायी आहे. तर दुसरीकडे महायुतीतील पक्षांनी एकमेकांचे गड उध्वस्त केले. पुणे आणि पिंपरी चिंचवड मध्ये असे काही घडले की पवार काका पुतण्याला तोंड दाखवायला जागा राहिली नाही. नवी मुंबई आणि ठाण्यात शिवसेनेने चांगली कामगिरी केली असली तरी गणेश नाईक शिंदेंचा टांगा पलटवण्याच्या तयारीत आहेत. आपल्याकडे श्रेयवादाच्या लढाया नेहमीच बघायला मिळतात. पण ज्याने काम केले ज्यांच्यावर चहूकडून लाथा बसत असतानाही ज्यांनी आपल्या मालकाशी ईमान राखले त्याला त्याच्या कामाचे श्रेय मिळायलाच हवे. महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांचा निकाल काय असू शकतो हे भाजपचे ४४ नगरसेवक बिनविरोध निवडून आले तेंव्हा लोकांना अगोदरच ठाऊक होते आणि शेवटी तसेच झाले. बाळासाहेबां बोट धरून महाराष्ट्राच्या राजकारणात स्थिरावलेल्या आणि नंतर बाळासाहेबांची शिवसेना फोडून गद्दारीचा सुवर्णमुकुट परिधान करून सत्ता मिळवणाऱ्या भाजपाने महाराष्ट्रासाठी असे कोणते मोठे काम केले की विधानसभा निवडणुकीपासून त्यांच्यावर मतांचा पाऊस पडतोय. याचे उत्तर सोपे आहे.जेव्हा तुमच्याकडे सत्ता असते. तेव्हा त्या सत्तेचा दुरुपयोग करून सरकारी यंत्रणा आपल्या दावणीला बांधून हवे ते करू शकता.सध्या तसेच सुरू आहे. सत्ताधाऱ्यांनी थेट निवडणूक आयोगालाच हाताशी धरून निवडणुका जिंकण्याचा सपाटा लावलय. त्यामुळे लोक इतके चिडले आहेत की हेच करायचे असेल तर निवडणुका घेताच कशाला असा संतप्त सवाल लोक विचारत आहेत. ओबीसी आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अनेक वर्ष रखडल्या होत्या अखेर सर्वोच्च न्यायालयाने जानेवारी २०२६ पर्यत या निवडणुका घेण्याचे आदेश दिले. मात्र हे आदेश देताना निवडणुक प्रक्रियेबाबत जे काही आक्षेप होते ते दूर करूनच निवडणुका व्हाव्यात अशी सर्वोच्च न्यायालयाची अपेक्षा होती. पण निवडणूक आयोगाने तसे केले नाही मतदार याद्यांमध्ये गोंधळ कायम ठेवला त्या दुरुस्त करण्याची ताडी घेतली नाही. त्याच बरोबर निवडणूक प्रचारात अनेक ठिकाणी पैसे वाटण्याचे प्रकार घडले ते निवडणूक आयोगाला रोखता आले नाहीत. मतदानाच्या दिवशी अनेक मतदान केंद्रावर सत्ताधारी भाजपाचे पोलिंग एजंट छातीवर उमेदवारांचे बिल्ले लावून काम करीत होते या प्रकरणी विरोधी उमेदवारांनी तक्रारी करूनही निवडणूक अधिकाऱ्यांनी दखल घेतली नाही. निवडणूक यंत्र घेऊन आलेल्या काही लोकांकडे ओळखपत्र किंवा शर्टवर नेंपलेट नव्हती त्यामुळे ते खरोखरच निवडणूक आयोगाचे लोक आहेत की कुठल्या पक्षाचे याबाबत अनेकाना संभ्रम होता. अशा परिस्थितीत झालेल्या निवडणुका आणि या निवडणुकांमध्ये निवडणूक आयोगाची संशयास्प भूमिका पाहता हा विजय महायुतीचा नसून निवडणूक आयोगाचा आहे असे लोक आता उघडपणे म्हणत आहेत. दरम्यान या निवडणुकीत प्रचंड मेहनत घेऊन तसेच एकजूट दाखवूनही ठाकरे बांधून अपेक्षित यश मिळाले नाही. अर्थात त्याचे मुख्य कारण अर्थातच निवडणूक आयोग आहे.त्यानंतर इतरही कारणे असतील ती यथावकाश समजतील मात्र या निवडणुकीत मतदारांनी घराणेशाहीला चांगलाच हिसका दाखवला. अनेकांचे नातेवाईक ज्यांनी वशिल्याण तिकिटे मिळवली होती ते पराभूत झाले. राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी काल मतदान झालं आणि आज मतमोजणी होऊन निकाल हाती येत आहेत. राज्यात पालिका निवडणुकांसाठी अनेक पक्षांनी बऱ्याच ठिकाणी पक्षातील नेते यांच्या कुटुंबातील नातेवआईक, मुलं, मित्र यांना उमेदवारी दिल्याचे समोर आले. मात्र त्यापैकी बऱ्याच जणांना मतदारांनी नाकारले असून अनेकांना पराभवाचा फटका बसला आहे.गेल्या महिन्यात, निवडणूक आयोगाने महापालिका निवडणुकांची घोषणा केली आणि एकच लगबग सुरू झाली. बघता बघता महिन्याचा कालावधी उलटून गेला आणि काल (१५ जानेवारी २०२६) राज्यभरातील २९ महापालिकांसाठी मोठ्या प्रमाणत मतदान झालं. तर आज सकालपासूनच मतमोजणीला सुरूवात झाली असून राज्यातील जवळपास २६ महापालिकांमध्ये भारतीय जनता पक्षच आघाडीवर असल्याचे दिसत आहे. दरम्यान या निवडणुकांमध्ये भाजपासह अनेक पक्षांनी त्यांच्याच पक्षातील अनेक नेते, पदाधिकारी यांचे कुटुंबीय, नातेवाईक, मित्र यांना उमेदवारी दिल्याचे चित्र दिसले. पक्षासाठी मान मोडून झटणाऱ्या, काम करणाऱ्या लोकांना, कार्यकर्त्यांना डावलून या नातेवाईकांना उमेदवारी दिल्याने अनेक पक्षात धूसफूस झाल्याचे चित्रही दिसत होते. पक्षाचे कार्यकर्ते फक्त मेहनतीसाठी आणि संतरंज्या उचलण्यासाठी असतात का असा सवालही अनेकांनी विचारला. घराणेशाहीवरून भाजप, काँग्रेसलवर जोरदार टीका करताना दिसतं, पण त्यांच्या पक्षातही फार वेगळं वातावरण नाही. घराणेशाहीवर सातत्याने आगपाखड करणाऱ्या भाजपाने सुद्धा अनेक नेत्यांच्या नातेवाईकांनाच तिकीट दिल्याने मोठ्या प्रमाणात टीका करण्यात आली होती. या निवडणुकीतही घराणेशाहीचा जोर स्पष्टपणे दिसत होता. मात्र असं असलं तरी राज्यातील जनतेने, मतदारांनी मात्र घराणेशाहीला नकार देत नेत्यांची मुल, पत्नी, मित्र, नातेवाईक यांच्याकडे थेट पाठ फिरवली. भाजप असो की शिवसेना, शिंदे गट, ठाकरे गट, अनेक दिग्गज नेत्यांच्या नातेवाईकांना परभावाच सामना करावा लागला. त्यामध्ये सदा सरवणकर यांचा पुत्र, नवाब मलिक यांचा भा, सुधाकर बडगुजर यांचा मुलगा, डॉन अरूण गवळी यांची मलगी यांच्यासह अनेकांचा समावेश होता. घराणेशाही नको, असं म्हणत मतदारांनी सरळ या उमेदवारांना मतदान करण्यास नकार दिला

# हिंद दी चादर : एकात्मतेची रेशमी वीण अन् संस्कृतीची ऊब!




नमस्कार..! पु.ल. देशपांडे एका ठिकाणी म्हणतात, माणसं जोडणं हाच खरा धर्म आणि ती टिकवणं हीच खरी संस्कृती. आपण जेव्हा 'हिंद दी चादर' म्हणतो, तेव्हा ती केवळ एक कापडाची उपमा नसते, तर ती कोट्यवधी हृदयांच्या स्पंदनांनी विणलेली एक संरक्षक कवच असते. कडाक्याच्या थंडीत जशी एखादी मायेची शाल आपल्याला ऊब देते, तशीच ही भारतीय संस्कृती विविधतेच्या वादळात आपल्याला आजही एकत्र धरून आहे.

माझे मित्र ठाणे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप साहेब यांच्याशी चर्चा करताना एक विषय निघाला, ते म्हणाले, कट्टी सर, आपली संस्कृती म्हणजे केवळ सण-उत्सव नाहीत, तर ते जगण्याचं एक शास्त्र आहे. जेव्हा आपण वेशभूषा, खाद्यपदार्थ किंवा व्यापार बघतो, तेव्हा त्यात आपल्याला एकमेकांबद्दलची आदरभावना दिसते. हीच भावना घेऊन आपण या चादरीचे विविध पदर उलगडणार आहोत.

**१. वेशभूषा: अस्मितेचे रंग..**

आपल्या वेशभूषेवरून आपली ओळख ठरते, पण भारतीय वेशभूषा ही 'अनेकता में एकता'चे उत्तम उदाहरण आहे. पंजाबातील शीख बांधवांची डौलदार दस्तार (पगडी), काश्मीरमधील पंडितांचा उबदार फेरण, महाराष्ट्रातील वारकऱ्यांचे पांढरेशुभ्र धोतर आणि उपरणं, आणि सिंधी बांधवांची वैशिष्ट्यपूर्ण टोपी-हे केवळ पेहराव नाहीत. पगडी ही केवळ डोक्यावरचं ओझं नाही, तर ती जबाबदारीची जाणीव आहे. जो पगडी घालतो, तो अन्यायाविरुद्ध उभा राहण्यासाठी बांधील असतो. वेशभूषा आपल्याला शिस्त आणि मर्यादा शिकवते. रंगांची ही उधळण जेव्हा एकत्र येते, तेव्हाच 'हिंद दी चादर' खऱ्या अर्थाने रंगीत आणि देखणी दिसते.

**२. खाद्य संस्कृती: चवीतला ओलावा..**

वेशभूषेच्या रंगांनंतर आपली नजर वळते ती तृप्त करणाऱ्या अन्नाकडे. अन्नाला आपण 'पूर्णब्रह्म' मानतो. अमृतसरच्या सुवर्ण मंदिरात मिळणारा 'कडा प्रसाद' असो, काश्मीरमधील सुगंधी 'कावा' असो, किंवा पंढरपूरच्या वारीतली 'पिठलं-भाकरी'-या प्रत्येक चवीत एक 'सामाईक' ओलावा आहे. तो म्हणजे 'लंगर'ची संकल्पना. खाद्य संस्कृती ही माणसाला माणसाशी जोडते. जेव्हा आपण एका पंगतीत बसून जेवतो, तेव्हा जात, पात आणि धर्म गळून पडतात. केवळ तृप्ती उरते. ही सामाईक पंगतच भारताची खरी ताकद आहे. जिथे अन्नाचा प्रत्येक घास 'सर्वांच्या भल्यासाठी' (सरबत दा भला) या भावनेतून दिला जातो, तिथे संस्कृतीची वीण अधिक घट्ट होते.

**३. व्यापार: विश्वासाचा पाया..**

जिथे पोटाची भूक भागते, तिथे प्रगतीची स्वप्नेही फुलतात. भारताचा व्यापार हा केवळ नफ्यावर आधारित नाही, तो 'विश्वासावर' उभा आहे. सिंधी बांधवांनी फाळणीनंतर शून्यातून विश्व उभं केलं, बंजारा आणि लबाना समुदायांनी तांड्यांच्या माध्यमातून प्राचीन काळी मालवाहतुकीची धुरा सांभाळली. व्यापारात 'जुबान' महत्त्वाची असते. एकदा शब्द दिला की तो पाळायचा, हा संस्कार आपल्याला या समुदायांनी दिला. व्यापार हा केवळ आर्थिक व्यवहार नसून तो संस्कृतीचा प्रवास आहे. एका प्रांतातला माल जेव्हा दुसऱ्या प्रांतात जातो, तेव्हा त्यासोबत तिथले विचारही प्रवासाला निघतात. हा व्यापारच आपल्याला एकमेकांवर अवलंबून राहायला शिकवतो आणि याच 'परस्पर स्वावलंबना'तून देशाची एकता टिकून राहते.

**४. शैक्षणिक आणि साहित्यिक प्रगती: विचारांचे तेज..**

व्यापारातून लक्ष्मी येते, तर साहित्यातून सरस्वती नांदते. आपल्या संस्कृतीचा कणा आहे आपले साहित्य. काश्मिरी पंडितांनी जपलेली संस्कृतची परंपरा असो किंवा संत नामदेव महाराजांनी पंजाबमध्ये पोहोचवलेली 'अभंगवाणी'-साहित्याने कधीच भौगोलिक सीमा मानल्या नाहीत. आपली गुरुद्वारे ही केवळ प्रार्थनास्थळे नसून ती शिक्षणाची केंद्रेही आहेत. तिथे इतिहासाचे धडे दिले जातात, स्वसंरक्षणाचे धडे दिले जातात आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'मानवतेचा' धडा दिला जातो. जेव्हा आपण एकमेकांचं साहित्य वाचतो, तेव्हा आपल्याला कळतं की, प्रत्येकाचं दुःख आणि आनंद सारखाच आहे. साहित्यिक प्रगती हीच समाजाची खरी वैचारिक प्रगती असते.

**५. गुरुद्वारा: मानवतेचं माहेरघर..**

या सर्व धाग्यांना एकत्र गुंफणारं पवित्र स्थान म्हणजे गुरुद्वारा. गुरुद्वाराच्या चारही दिशांना उघडणारी चार प्रवेशद्वारे हेच सांगतात की, येथे कोणालाही मज्जाव नाही. जेव्हा दिल्लीत गुरु तेग बहादूरजींनी बलिदान दिलं, तेव्हा त्यांनी केवळ एका धर्माचं रक्षण केलं नाही, तर मानवाच्या श्रद्धेच्या अधिकाराचं रक्षण केलं. आजही जेव्हा देशावर संकट येतं, तेव्हा गुरुद्वारे सर्वात आधी मदतीचा हात पुढे करतात. हाच तो 'चादरी'चा सर्वात मजबूत कोपरा आहे. सानप साहेब अभिमानाने म्हणतात, कट्टी सर, गुरुद्वारात मिळणारी शांतता ही जगात कुठेच मिळत नाही, कारण तिथे सेवा हाच परमेश्वर मानला जातो. आपणच आहोत ती चादर!

अखेर ही 'हिंद दी चादर' म्हणजे दुसरं तिसरं काही नसून आपण भारतीय नागरिकच आहोत. जेव्हा आपण एकमेकांच्या वेशभूषेचा आदर करतो... जेव्हा आपण दुसऱ्याच्या खाद्य संस्कृतीचा आनंद घेतो...

जेव्हा आपण व्यापारात प्रामाणिकपणा जपतो...

आणि जेव्हा आपण साहित्यातून एकमेकांचे विचार समजून घेतो...

...तेव्हाच ही चादर अधिक मजबूत होते.

आपल्याला फाटलेली चादर शिवण्यापेक्षा, ती कधीच फाटू नये याची काळजी घेणारे 'दोरे' बनायचं आहे.

प्रवास संपला नाही, तर तो हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शहिदी समागम या कार्यक्रमाच्या माध्यमातून आणि आपल्या आचरणातून आता खऱ्या अर्थाने सुरू झाला आहे...!

**लेखक : विजयकुमार कट्टी,**
**पर्यावरण संरक्षक व मार्गदर्शक, ठाणे**

# मानवता आणि समतेचे सुवर्णशिखर : श्री हरमंदिर साहिब



भारतीय उपखंडाच्या इतिहासात अशी मोजकीच स्थळे आहेत, जी केवळ धार्मिक श्रद्धास्थान न राहता मानवी मूल्यांचा दीपस्तंभ बनली आहेत. अमृतसरचे 'श्री हरमंदिर साहिब' अर्थात सुवर्ण मंदिर हे त्यापैकीच एक. चहुबाजूंनी पसरलेले पवित्र अमृत सरोवर, त्यामध्ये झळाळणारे सुवर्ण मंदिर आणि कानावर पडणारे गुरबानीचे शांत स्वर... हे केवळ दृश्य नसून तो एक आध्यात्मिक अनुभव आहे जो शतकानुशतके जगाला शांती आणि बंधुत्वाचा संदेश देत आहे

**सूफी संतांच्या हस्ते पायाभरणी**

सर्वधर्मसमभावाचा वारसा या पवित्र वास्तूचा पायाच मुळी सामाजिक सलोख्यावर आधारलेला आहे. १५७७ मध्ये शीख धर्माचे चौथे गुरू गुरू रामदास साहिब यांनी या शहराचा पाया रचला. मात्र, मंदिराच्या निर्मितीचा संकल्प पाचवे गुरू गुरू अर्जुन देव साहिब यांनी पूर्णत्वास नेला. या मंदिराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, शिखांच्या या सर्वोच्च केंद्राची पायाभरणी एका मुस्लिम सूफी संताच्या, म्हणजेच हजरत मियाँ मीर साहिब यांच्या हस्ते करण्यात आली. हा प्रसंग आजही भारतीय संस्कृतीतील 'गंगा-जमुनी' तहजीबचा सर्वात मोठा पुरावा मानला जातो. वास्तुरचनेत दडलेली नम्रता आणि समानता जगातील बहुतेक धार्मिक स्थळे ही उंचीवर किंवा पर्वतावर असतात, परंतु श्री हरमंदिर साहिबची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. हे मंदिर जमिनीच्या पातळीपेक्षा खाली बांधले गेले आहे, जे 'नम्रतेचे' प्रतीक आहे. मंदिरात प्रवेश करण्यासाठी भाविकाला पायऱ्या उतरून जावे लागते, याचाच अर्थ ईश्वराच्या दारात येताना अहंकार त्यागून येणे आवश्यक आहे. तसेच, मंदिराची चार प्रवेशद्वारे हे दर्शवतात की, येथे येण्यासाठी जात, धर्म, वर्ण किंवा लिंगाचा कोणताही अडथळा नाही; हे द्वार सर्वांसाठी सदैव खुले आहे.

**महाराजा रणजित सिंह आणि 'सुवर्ण' झळाळी**

सुरुवातीला साध्या रचनेत असलेल्या या वास्तूला १९ व्या शतकात खऱ्या अर्थाने सुवर्ण झळाळी मिळाली. शिखांचे महान शासक महाराजा रणजित सिंह यांनी या मंदिराच्या घुमटावर आणि भिंतींवर सोन्याचे पत्रे अर्पण केले. तेव्हापासून हे श्री'हरमंदिर साहिब' सातासमुद्रापार 'गोल्डन टेम्पल' म्हणून ओळखले जाऊ लागले. सुवर्ण मंदिर हे केवळ शिखांचे नाही, तर ते अखिल मानवजातीचे आध्यात्मिक आश्रयस्थान आहे.



**लंगर**

जगातील सर्वात मोठी सेवा संस्कृती सुवर्ण मंदिराचा उल्लेख 'लंगर' सेवेशिवाय अपूर्ण आहे. कोणताही भेदभाव न करता, एकाच पंगतीत बसून हजारो लोक येथे प्रसाद ग्रहण करतात. ही परंपरा केवळ भूक भागवण्यासाठी नसून ती समाजातील उच्च-नीचतेची भिंत पाडण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. सेवा, त्याग आणि समर्पण या त्रिसूत्रीवर आधारलेली ही व्यवस्था आजही जगाला अचंबित करते. आधुनिक भारताचे सांस्कृतिक वैभव १६०४ मध्ये गुरू अर्जुन देव साहिब यांनी येथे 'आदि ग्रंथाची' प्रतिष्ठापना केली आणि हे स्थळ आध्यात्मिक ऊर्जेचे केंद्र बनले. आज २१ व्या शतकातही, हे मंदिर आपल्या मूळ मूल्यांशी घट्ट जोडलेले आहे. भारतीय लोकशाहीतील समानता आणि सहिष्णुतेचा आत्मा हरमंदिर साहिबमध्ये खऱ्या अर्थाने प्रतिबिंबित होतो.

**- राहुल शोभाबाई लक्ष्मणराव भालेराव,**
**जिल्हा माहिती अधिकारी, पालघर**

# जैन इरिगेशनच्या कृषी महोत्सवास शेतकऱ्यांचा प्रतिसाद 30 जानेवारीपर्यंत शेतीतील प्रयोग पाहता येणार

**जळगाव : वार्ताहर**

जैन इरिगेशन सिस्टीम्स लिमिटेडच्या जैन हिल्स येथे सुरू असलेल्या कृषी महोत्सवाला शेतकऱ्यांकडून मिळणाऱ्या प्रचंड प्रतिसादामुळे हा महोत्सव १४ जानेवारीऐवजी आता ३० जानेवारी २०२६ पर्यत वाढविण्यात आला आहे. १२ डिसेंबरपासून आजपर्यंत देशाच्या कानाकोपऱ्यातून तसेच महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यांमधून सुमारे ३२ हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी या महोत्सवाला भेट दिली. जैन हिल्सवरील हा कृषी महोत्सव म्हणजे केवळ प्रदर्शन नव्हे, तर प्रत्यक्ष शेतीत वापरता येईल असे अत्याधुनिक तंत्रज्ञान पाहण्याची आणि अनुभवण्याची संधी आहे. शेतकरी येथे येऊन नव्या शेती पद्धती, सुधारित वाण, सूक्ष्म सिंचन व्यवस्था आणि प्रिसिजन शेतीची प्रत्यक्ष प्रात्यक्षिके पाहत आहेत आणि त्यातून प्रेरणा घेऊन परत जात आहेत. उत्तर महाराष्ट्रातील प्रमुख पिकांपैकी कांदा, केळी हे पीक आहेत. प्रक्रियेसाठी वापरल्या जाणाऱ्या पांढऱ्या कांद्याच्या सुधारित व्हरायटी, टोमॅटो लागवड, तसेच करार शेतीच्या माध्यमातून हमी भावाने कांदा व टोमॅटो खरेदीची व्यवस्था कशी उभी केली जाते, याचे सविस्तर मार्गदर्शन येथे मिळत आहे. यासोबतच डाळिंब, मोसंबी, जैन स्वीट ऑरेंज, आंबा, पपई आदी फळपिकांच्या लागवड पद्धतींमध्ये झालेल्या बदलांची माहिती देण्यात येत आहे. अतिसघन लागवड पद्धतीमुळे कमी जागेत, कमी पाण्यात आणि कमी खर्चात अधिक उत्पन्न कसे मिळू शकते, याची प्रत्यक्ष उदाहरणे शेतकऱ्यांसमोर मांडण्यात आली आहेत.

सूक्ष्म सिंचन क्षेत्रात ठिबक व तुषार सिंचनासह जैन ऑटोमेशन प्रणालीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. ५० ते १०० एकर किंवा त्याहून अधिक क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही प्रणाली कशी उपयुक्त ठरते, सिंचन व फर्टिगेशनद्वारे खतांचे अचूक नियंत्रण कसे साधता येते आणि मजुरीवरील अतिरिक्त खर्च कसा कमी होतो, याचे प्रात्यक्षिक येथे पाहायला मिळत आहे. जैन हिल्सवरील कृषी महोत्सव हा खऱ्या अर्थाने हायटेक शेती, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा संगम आहे. प्रत्यक्ष उभ्या पिकांवर केलेले प्रयोग, शास्त्रोक्त पद्धतींची प्रात्यक्षिके आणि जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान यामुळे शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढताना दिसत आहे. यावर्षी 'सायन्स-टेकवर्क' ही संकल्पना घेऊन हायटेक, प्रिसिजन आणि क्लायमेट स्मार्ट शेतीचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी खुले करण्यात आले आहे. अधिकाधिक शेतकरी बांधवांनी जैन हिल्स येथे येऊन या महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जैन इरिगेशनच्यावतीने करण्यात आले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

19 TO 25 JANUARY 2026 - Page 5 (CRIME SANDHYA) NEW:Layout 1 1/17/2026 10:11 PM Page 1



# डुप्लीकेट सोन्याचे बिस्किट विकणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश

**लातूर : वार्ताहर**

लातूर जिल्ह्यात नागरिकांना बनावट सोन्याचे बिस्कीट खरे आसल्याचे भासवून खरे सोन्याचे दागिने व रोख रक्कम हडप करणाऱ्या एका अत्यंत संघटित व चलाख टोळीचा लातूर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अत्यंत कौशल्यपूण तपास करत पर्दाफाश केला आहे. या कारवाईत एकूण ०५ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून टोळीचा मुख्य सूत्रधार संदीप दगडू जाधव हा फरार आहे. आरोपींकडून सुमारे ९ लाख १ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात एलसीबीच्या पोलिसांना यश आले आहे.



याबाबत पोलिस सुत्रांकडून मिळालेलली माहीती अशी की, मागील काही काळापासून बनावट सोने विकणारी ही टोळी लातूर जिल्हयात सक्रिय झाली होती.डुप्लीकेट सोन्याचे बिस्कीट, अंगठ्या व इतर दागिने तयार करून ते खरे सोने असल्याचा आभास निर्माण करत सामान्य नागरिकांची फसवणूक करीत होती. विशेषतः महिला, वृद्ध नागरिक व एकटे प्रवास करणारे लोक यांना लक्ष्य करून ही टोळी अत्यंत चलाखीने आपला गुन्हेगारी उद्योग चालवत होती. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी नमूद प्रकारच्या टोळीचा शोध घेऊन कारवाई करण्याबाबत मार्गदर्शन करून सूचना केल्या होत्या. त्या अनुषंगाने लातूर जिल्हा अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक लातूर जिल्ह्यात डुबलीकेट सोने देऊन फसवणूक करणाऱ्या आरोपींचा अनेक दिवसापासून शोध वेगवेगळ्या मार्गाने माहिती संकलित करून विश्लेषण करत होते. दरम्यान विशेष पथकाला दिनांक १३ जानेवारी रोजी गरुड चौक, लातूर परिसरात गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिति मिळाली की, गरुड चौक ते राजीव गांधी चौक रिंग रोडवरील सिंकंदरपूर जाणाऱ्या रस्त्यावर एक टाटा इंडीगो कार व एक होंडा एक्टिवा स्कूटीसह काही इसम डुप्लीकेट सोन्याचे बिस्कीट विक्री करून फसवणूक करण्यासाठी थांबले आहेत. माहितीची खात्री होताच पथकाने सायंकाळी ५ वाजता सापळा लावून पाच इसमांना ताब्यात घेण्यात आले. ताब्यात घेतलेले आरोपी अभिमान राजेंद्र कांबळे (वय २५ वर्षे, रा. तुपडी, ता. निलंगा), धनंजय बालाजी गायकवाड ( वय २८ वर्षे, रा. दगडवाडीत, लातूर) बालाजी प्रशांत कांबळे, (वय २२ वर्षे, रा. तुपडी, ता. निलंगा), बालाजी विठ्ठल गायकवाड (वय ५४ वर्षे, रा. भातखेडा, लातूर), सचिन बालाजी गायकवाड (वय २८ वर्षे, रा. मेघराज नगर, शाहू चौक, लातूर) यांची झडती घेतली तेव्हा त्यांच्याकडे अंदाजे ४२ ग्रॅम खरे सोन्याचे दागिने, रोख रक्कम, डुप्लीकेट सोन्याचे बिस्कीट १६ नग, डुप्लीकेट अंगठ्या ०३ नग, टाटा इंडीगो कार (चक २३ ध ९२२२), होंडा एक्टिवा स्कूटी (चक२४ इन ९३०८) असा एकूण ९ लाख १ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तपासात आरोपींनी कबुली दिली आहे की, त्यांचे टोळीचा मुख्य सूत्रधार संदीप दगडू जाधव (वय अंदाजे २७ वर्षे, रा. सलगरा, ता. जि. लातूर, सध्या रा. जठाळ कॉलनी, लातूर फरार) व सचिन बालाजी गायकवाड हे सोनार व्यावसायिक असून ते डुप्लीकेट सोन्याचे बिस्कीट व दागिने तयार करून देत इतर आरोपी त्या डुप्लीकेट दागिन्यांचा वापर करून लोकांना खरे सोने स्वस्तात मिळत आहे किंवा रस्त्यावर पडलेले सोने आहे असे सांगून फसवणूक करीत. नागरिकांकडील खरे सोन्याचे दागिने व रोख रक्कम घेऊन ती सर्व मालमत्ता संदीप जाधव कडे सुपूर्द केली जात असे. आरोपींनी दिलेल्या माहितीनुसार व पोलीस अभिलेख तपासणीअंती पोलीस ठाणे उदगीर शहर, औसा, देवणी, शिवाजीनगर, उदगीर ग्रामीण, चाकूर येथे भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३ (५) अन्वये दाखल गुन्ह्यांशी त्यांचा थेट संबंध आढळून आला आहे .तसेच नमूद टोळीने धाराशिव, नांदेड, परभणी जिल्ह्यातही डुप्लिकेट सोन्याचे बिस्किट देऊन फसवणूकचे गुन्हे केल्याचे कबूल केले आहेत. पुढील कायदेशीर कारवाई करिता नमूद आरोपींना पोलीस ठाणे उदगीर शहर यांच्या ताब्यात देण्यात आले असून टोळीचा मुख्य सूत्रधार व टोळी प्रमुख फरार आरोपी संदीप जाधव याचा पोलीस पथक शोध घेत असून त्याला नमूद गुन्ह्यात लवकरच अटक करण्यात येणार आहे. सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या विशेष पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, पोलीस उप निरीक्षक अमर केंद्रे, राजेश घाडगे, प्रमोद देशमुख, पोलीस अमलदार साहेबराव हाके, रियाज सौदागर, राजेश कंचे, मोहन सुरवसे, युवराज गिरी, मनोज खोसे, आनंद हल्लाळे, प्रवीण कोळसुरे, सिद्धेश्र्वर मदने, जमीर शेख, राहुल कांबळे, प्रदीप चोपणे, व्यंकटेश निटुरे, संतोष खांडेकर, शैलेश सुडे, महिला पोलीस अंमलदार सुरेखा मदने, अंजली गायकवाड यांनी केली आहे. दरम्यान रस्त्यावर किंवा अनोळखी व्यक्तीकडून स्वस्तात सोने मिळते अशा आमिषाला बळी पडू नये. अनोळखी व्यक्तींशी आर्थिक व्यवहार करताना अत्यंत सावधगिरी बाळगावी. अशा संशयास्पद घटना आढळल्यास त्वरित नजीकच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा असे आव्हान लातूर पोलिस दलाने केले आहे.

## कल्याण येथे एअर होस्टेसची गळफास लावून आत्महत्या!

**कल्याण : वार्ताहर**

मुंबईतील कल्याण पूर्व येथील २९ वर्षीय एअर होस्टेसने २८ डिसेंबर २०२५ रोजी आपल्या राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली होती. सुरुवातीला ही घटना केवळ एक आकस्मिक मृत्यू वाटत होती, परंतु कोळसेवाडी पोलिसांनी केलेल्या सखोल तपासानंतर या प्रकरणाला १० जानेवारी रोजी वेगळं वळण लागलं आहे. पीडितेच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी तिच्या २३ वर्षीय माजी प्रियकराविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याची तक्रार नोंदवली आहे. मृत तरुणीच्या मोबाईलमधील चॅट्स आणि आर्थिक व्यवहारांची तपासणी केल्यानंतर पोलिसांच्या हाती अनेक धक्कादायक पुरावे लागले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तपासादरम्यान असं समोर आलं की, आरोपी आणि पीडिता गेल्या पाच वर्षांपासून एकमेकांच्या संपर्कात होते. आरोपीनं लग्नाचं आमिष दाखवून तिच्याकडून लाखो रुपये उकळले असून, शेवटचा व्यवहार १६ डिसेंबर २०२५ रोजी झाला होता. इतकंच नाही तर, आरोपीने तिचे खासगी फोटो सार्वजनिक करण्याची धमकी देऊन तिला वारंवार मारहाण केल्याचंही चॅट्सवरून समोर आलं आहे. दुसऱ्या महिलेशी संबंध प्रस्थापित करून लग्नास नकार दिल्यानं ती प्रचंड मानसिक दडपणाखाली होती. या सर्व छळाला कंटाळून तिनं टोकाचं पाऊल उचलल्याचा आरोप तिच्या कुटुंबीयांनी केला आहे. तपासादरम्यान पीडितेच्या मोबाईलमधील चॅट्समधून अनेक धक्कादायक बाबी उघड झाल्या आहेत. आरोपीने तिचे काही खासगी फोटो सार्वजनिक करण्याची धमकी दिली होती आणि तो तिला वारंवार मारहाण देखील करत होता. तिच्या शरीरावरील मारहाणीच्या खुणा आणि चॅट रेकॉर्ड्सवरून तिला देण्यात आलेला मानसिक आणि शारीरिक त्रास स्पष्ट झाला आहे. या सातत्यपूर्ण छळाला कंटाळून अखेर तिने आपल्या राहत्या घरी टोकाचं पाऊल उचलल्याचं पोलिसांनी सांगितलं.

## पाण्याचा अंदाज न आल्यानं वडील बुडाले, वाचवायला गेलेल्या मुलीचाही तोल गेला!

**विरार : वार्ताहर**



खदानीत बुडून वडील आणि मुलीचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना विरार येथे घडली आहे. वडील विनायक सितक (वय ४८) आणि मुलगी इकांशा सितप (वय १५) अशी मृत दोघांची नावं आहेत. या घटनेमुळे सितप कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. ही घटना काल बुधवारी मकर संक्रांतीच्या दिवशी घडली, त्यामुळे हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. विरार येथील बरफपाडा परिसरात मुंबईतील जोगेश्वरी परिसरातील रहिवासी असलेले वडील विनायक सितप आणि मुलगी इकांशा सितप मकर संक्रांतीच्या सणानिमित्त नातेवाईकांकडे आले होते. बरफपाडा परिसरातच असलेल्या एका खदानीजवळ वडील आणि मुलगी असे दोघेजण गेले. यावेळी विनायक सितप खदानीत पोहोण्यासाठी उतरले. खदानीतील पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने वडील विनायक सितप पाण्यात बुडू लागले. वडील पाण्यात बुडत असल्याचे पाहून वडिलांना वाचवण्यासाठी मुलगी इकांशा ही देखील खदानीच्या पाण्यात उतरली. मात्र, दुर्दैवाने वडील आणि मुलगी असे दोघेही खदानीच्या पाण्यात बुडाले. काल बुधवारी सायंकाळच्या सुमारास ही घटना घडली आहे. घटनेची माहिती स्थानिकांनी पोलिसांना दिल्यानंतर विरार पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. खदानीच्या पाण्यात बुडालेल्या वडील आणि मुलीचा अग्निशमन दलाच्या जवानांनी शोध घेत मृतदेह पाण्याबाहेर काढले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करत दोनही मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले. या प्रकरणी विरार पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## स्वामी विवेकानंद विद्या मंदिरच्या विद्यार्थ्याचे प्रज्ञाशोध परीक्षेत घवघवी यश



**वाडा : वार्ताहर**

इस्कॉन फाउंडेशन गालतरे आयोजित विविध प्रज्ञाशोध परीक्षेत स्वामी विवेकानंद विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असून त्यामध्ये इयत्ता सातवीसाठी गणित प्रज्ञाशोध परीक्षेत अक्षद बाळासाहेब पवार, शौर्य नवनाथ शिंदे, आशिष जनार्दन बेडसे यांनी तर इयत्ता आठवीच्या गीता प्रज्ञाशोध परीक्षेत परिधी प्रभू पाटील, प्रेक्षा राजेंद्र देशमुख, मनस्वी प्रवीण बांबरे, तर इयत्ता नववी गणित विज्ञान प्रज्ञाशोध परीक्षेत स्मित किशोर काठोळे, मेहुल सुनील कोरडा यांनी हे यश संपादन केलं असून शिक्षकांसाठी घेण्यात आलेल्या गीता प्रज्ञाशोध परीक्षा गणेश धोंडू कुमावत यांचा दुसरा क्रमांक आला आहे. शाळेतील या परीक्षेचे समन्वयक म्हणून जितेंद्र पाटील यांनी काम पाहिले. सर्व विद्यार्थ्यांचे शिक्षक संचालित शिक्षण संस्थेचे सरचिटणीस विशाल कुलकर्णी, जगदीश चिते मुख्याध्यापक सुनील पाडवी यांनी अभिनंदन केले असून बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### आदर्श आचारसंहिता कक्ष कार्यान्वित

लातूर : राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीसाठी १३ जानेवारी २०२६ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. न्याय्य, नि:पक्षपाती आणि पारदर्शक वातावरणात निवडणुका पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या आदेशाने जिल्हा परिषद कार्यालयात जिल्हास्तरीय आदर्श आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाचे नोडल अधिकारी म्हणून जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ए.जे. तडवी यांची, तर सहायक नोडल अधिकारी म्हणून महिला व बाल कल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी जावेद शेख यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या कक्षात प्रदीप बोंबले, बालाजी पोतदार, विष्णू शिंदे, राहुल सुतार आणि गणेश लोणकर यांचा समावेश आहे. तसेच, प्रत्येक तालुकास्तरावर संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अधिनस्त आदर्श आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. निवडणूक प्रक्रियेदरम्यान आचारसंहितेचे कोणतेही उल्लंघन आढळल्यास नागरिकांनी त्वरित जिल्हा आदर्श आचारसंहिता कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. निवडणूक घोषित झाल्यापासून सर्व राजकीय पक्ष, उमेदवार आणि इतर संबंधित व्यक्तींनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करणे अनिवार्य आहे.

### कर्करोग व डोळ्यांते तपासणी शिबिर

लातूर : रेणापूर तालुक्यातील पाथरवाडी येथे श्री महादेव हनुमान अध्यात्मिक पीठ व रोटरी क्लब लातूर मिटाऊन स्वामी विवेकानंद कॅन्सर हॉस्पिटल लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कर्करोग निदान शिबिर व डोळ्यांच्या तपासणी शिबिरास अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पाथरवाडीच्या श्री महादेव हनुमान अध्यात्मिक पीठच्या वतीने सातत्यानेअशा प्रकारचे समाजोपयोगी उपक्रम राबविण्यावर भर दिला जात आहे. ग्रामीण भागातील रुग्णांच्या सोयीसाठी सदर शिबिराचे आयोजन केले गेले. या शिबिराचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते दिलीप पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष अमोल दाडगे, पाथरवाडीचे सरपंच महेश सुडे, कर्करोग तज्ञ डॉ. बाजीराव जाधव, नेत्ररोग तज्ञ डॉ. पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिरात एकूण २८० रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले. नेत्र तपासणीत दोष आढळलेल्या ४५ रुग्णांना सोलापूर येथील नेत्र चिकित्सालय रुग्णालयात शस्त्रक्रियासाठी विनामूल्य घेऊन जाण्याची व्यवस्था करण्यात आली. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी रमेश मद्दे, पंडितराव मुंढे, दगडू सोमवंशी, कमलाकर सूर्यवंशी, गोरख साळुंखे, जगदीश मद्दे, नवनाथ मद्दे, जगन्नाथ येमले, सौ. शोभा येमले इत्यादींनी परिश्रम घेतले.

### रुग्णालयामार्फत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

वसई : रयत शिक्षण संस्थेचे, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व एस.पी. ज्युनियर कॉलेज, जूचंद्र येथे तीन दिवस ग्रामीण रुग्णालय विरार अंतर्गत आरोग्य तपासणी उत्साहात पार पडली. यावेळी तब्बल १५४८ विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी करण्यात आली. यासाठी डॉ. तेजस्विनी पाटील, डॉ. आशिष राठोड, सविता सातवी यांनी आपले योगदान दिले. त्यांनी इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांची तपासणी करून आणि संवाद साधून चर्चा केली. विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. विद्यालयातील एकूण १५४८ विद्यार्थ्यांपैकी १०० विद्यार्थ्यांमध्ये किरकोळ दोष आढळले, त्या विद्यार्थ्यांना निदानासंबधी मार्गदर्शन केले गेले. यावेळेस आरोग्य विभाग प्रमुख मिताली कुलदीप म्हात्रे व यादव सर तसेच सर्व शिक्षकांचे व शाळेतील इतर कर्मचारी वर्गाचे सहकार्य लाभले. विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागाचे सहाय्यक विभागीय अधिकारी विलासराव जगताप सर व विद्यालयाचे प्रमुख लेखनिक सुरेश राऊत सर व यादव सर यांनी सर्व डॉक्टरांचे विद्यालयाच्या वतीने हार्दिक स्वागत केले. यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांसह शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आरोग्याची काळजी कशी घ्यावी याबाबत बहुमोल मार्गदर्शन केले.


**महाराष्ट्र शासन**

**कृषि विभाग**

**उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर, जि. पालघर**

**ई-निविदा सूचना क्र. १५/उविकृअपा/२०२५-२६**

जिल्हा नियोजन समिती (DPDC) व आदिवासी विकास प्रकल्प (TSP) अंतर्गत सन २०२५ - २६ मधील पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील खालील तक्त्यात नमुद केल्या प्रमाणे विविध कामे करण्यासाठी उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर, जि. पालघर फोन नं. ०२५२५ २४१९२७ बी-१ प्रपत्रात निविदा सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून आमंत्रित करण्यात येत आहेत. सविस्तर माहीती उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर, जि. पालघर कार्यालयात दिनांक १५/०१/२०२६ नंतर पहावयास व विक्रीसाठी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील सर्व शुध्दीपत्रक, दुरुस्त्या सुध्दा उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर, जि. पालघर कार्यालयात पहावयास मिळेल. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर / जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, पालघर यांनी राखून ठेवला आहे. कामाचे संक्षिप्त वर्णन खालील प्रमाणे :-

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | बयाना रक्कम (१ टक्के) | निविदा शुल्क | कामपूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग | निविदा विक्री सुरू करण्याचा दिनांक व वेळ | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | निविदा उघडणे दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ४८ | मौजे- गडचिंचले - मजगी गट क्रमांक ०१ ते १२ + किन्हवली गट क्र. ३४ ते ३७ + दिवशी - जुनी भातशेती दुरुस्ती गट क्रमांक ०१ ते ०२ ता. डहाणू, जि.पालघर, निविदा प्रक्रियेत सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदार भाग घेवू शकतील. (निविदा प्रक्रियेत फक्त पालघर जिल्ह्यातील मजूर सहकारी कामगार संस्था भाग घेवू शकतील.) | २१३५९०४ | २१३५९ | ५९० | ३० दिवस | १ ते ६ | १६/०१/२०२६ ११.०० | २३/०१/२०२६ १७.०० | २५/०१/२०२६ ११.०० |
| २. | ४९ | मौजे - दाभाडी - मजगी गट क्रमांक १४ ते २६ + किन्हवली -मजगी गट क्रमांक गट क्र. ३९, ४२ व ४४ ता. डहाणू, जि. पालघर, निविदा प्रक्रियेत सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदार भाग घेवू शकतील. (निविदा प्रक्रियेत फक्त पालघर जिल्ह्यातील मजूर सहकारी कामगार संस्था भाग घेवू शकतील.) | १९३९९४६ | १९३९९ | ५९० | ३० दिवस | १ ते ६ | १६/०१/२०२६ ११.०० | २३/०१/२०२६ १७.०० | २५/०१/२०२६ ११.०० |
| | | एकूण | ४०७५८५० | | | | | | | |

**ई-निविदेबाबत खालीलप्रमाणे अटी व शर्ती निविदाधारकांस बंधनकारक राहतील :-**

१. मा. संचालक कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील ई-निविदा मार्गदर्शक सुचना दि. ०६ एप्रिल २०२३ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ई-निविदा सादर करावी.
२. मा.कृषि आयुक्त पुणे यांचेकडील शुद्धीपत्रक दि. २६ ऑगस्ट २०२४ नुसार जिओ टॅग बाबत असलेल्या मुद्दा क्र. ११ व त्याचे संदर्भातील इतर सर्व तरतुदी रद्द करण्यात येत आहेत.
३. ई-निविदे बाबतचे शुद्धीपत्रक, दुरुस्त्या आवश्यक असल्यास उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर, जि. पालघर यांचेमार्फत संकेतस्थळावर करण्यात येतील.
४. गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम अंतर्गत मार्गदर्शक सूचना बंधनकारक राहतील.
५. भौगोलिक व नैसर्गिक परिस्थितीनुसार कार्यारंभ आदेशाबाबत कार्यवाही करण्यात येईल.
६. ठेकेदाराने अटी व शर्ती असलेली निविदा सादर केल्यास ती स्वीकारली जाणार नाही.
७. निविदा प्रक्रियेमध्ये शासन स्तरावर निविदा प्रक्रियेच्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय बंधनकारक राहतील.

सही/-
उपविभागीय कृषि अधिकारी,
पालघर, जि. पालघर

जिमाका/पालघर/ जाहि १६३/३५/२०२६ दिनांक : १३/०१/२०२६


### एकाच कुटुंबातील तिघं तीन पक्षांकडून विजयी!

कल्याण : कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीमध्ये भाजप-शिवसेना महायुतीने दणका उडवून दिला आहे. डोंबिवलीमध्ये तर एकाच कुटुंबातील तिघे उमेदवार वेगवेगळ्या पक्षांच्या तिकीटावर निवडणूक लढत होते, या तिघांनाही विजय मिळाला आहे. डोंबिवलीमधल्या पॅनल २१ मधून म्हात्रे कुटुंबातील तिघांचा विजय झाला आहे. पॅनल २१ अ मधून मनसेचे प्रल्हाद म्हात्रे, २१ ब मधून भाजपच्या डॉ. रविना राहुल म्हात्रे आणि २१ क मधून शिवसेना शिंदे गटाच्या रेखा म्हात्रे विजयी झाल्या आहेत. हे तिघेही एकाच कुटुंबातील असूनही वेगवेगळ्या पक्षातून निवडणूक लढले होते. म्हात्रे कुटुंबामध्ये प्रल्हाद म्हात्रे हे दीर, रेखा म्हात्रे या भावजय आणि रविना म्हात्रे या सूनबाई आहेत. आता हे तिघेही वेगवेगळ्या पक्षाच्या नगरसेवक म्हणून पालिकेच्या सभागृहामध्ये बसणार आहेत. शिवसेना सध्या १२ जागांवर विजयी झाली आहे, तर ६ जण बिनविरोध निवडून आले असून ४० जागांवर शिवसेना आघाडीवर आहे. तर भाजपचा ८ जागांवर विजय झाला असून त्यांचे बिनविरोध १६ उमेदवार निवडून आले आहेत.

19 TO 25 JANUARY 2026 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 1/17/2026 10:12 PM Page 1



## भिवंडीत भाजप कार्यकर्त्यांकडून कोणार्क विकास आघाडीच्या समर्थकांना मारहाण

**भिवंडी : वार्ताहर**

शहरात मनपा निवडणुकीसाठी मतदानाला सकाळपासून सुरुवात झाली असून काही ठिकाणी शांततेत तर काही ठिकाणी तणावपूर्ण वातावरणात मतदान सुरु आहे.प्रभाग क्रमांक एक येथे भाजपा आमदार महेश चौघुले आणि कोणार्क आघाडीचे उमेदवार माजी महापौर विलास पाटील यांच्या कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची होऊन चौघुले कार्यकर्त्यांनी कोणार्क विकास आघाडी समर्थकांना मारहाण केली आहे.सकाळपासूनच या दोन्ही गटात शाब्दिक बाचाबाची सुरु झाली होती तर सकाळी अकरा वाजेच्या दरम्यान चॅलेंज ग्राऊंड परिसरात कोणार्कच्या एका कार्यकर्त्याला मारहाण केली.तर कोंबडपाडा येथील साईनाथ मंदिर परिसरात देखील कोणार्कच्या एका कार्यकर्त्यास भाजप कार्यकर्त्यांनी मारहाण केली आहे. प्रभाग क्रमांक एक मध्ये भाजप पुत्र मित महेश चौघुले हे माजी महापौर पुत्र मयुरेश विलास पाटील यांच्या विरोधात निवडणूक रिंगणात उभे राहिल्यापासून या प्रभागात हाणामारी व मारहानीच्या घटना मागील अनेक दिवसांपासून सुरु आहेत. प्रभाग क्रमांक १९ मधील मतदान केंद्र २२ ते २६ या ठिकाणी काँग्रेस व समाजवादीचे कार्यकर्ते आपसात भिडले होते.त्यामुळे याठिकाणी काही काळ गोंधळ उडाला होता. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांना केंद्रा बाहेर पळवून लावल्याने परिस्थिती नियंत्रणात आणली.त्यांनतर या केंद्रांवर मतदान प्रक्रिया सुरळीत सुरू झाली. प्रभाग दोन येथे दुपारी एक वाजेच्या सुमारास समाजवादी व राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली होती.

# अवैध दारु विक्री व वाहतुक करणाऱ्या इसमांवर गुन्हे शाखेची कारवाई

**सोलापूर : इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर महानगर पालिका निवडणूक २०२६ चे अनुषंगाने सोलापूर शहरामध्ये अवैध मद्य निर्मीती, विक्री व वाहतुक करणाऱ्या इसमांवर कारवाई करण्याबाबत पोलीस आयुक्त सोलापूर शहर यांनी गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना विशेष मोहिम घेवून कारवाई करणे संदर्भात मार्गदर्शन करून सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने ९ जानेवारी २०२६ रोजी गुन्हे शाखेकडील सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेश खेडकर व त्यांचे तपास पथक यांना प्राप्त गोपनिय माहीतीच्या आधारे सलगरवस्ती पोलीस स्टेशन हद्दीतील कवठे येथील इसम कुमार ऊर्फ बाबु पांडुरंग चव्हाण रा. भोजप्पा तांडा, ता. उत्तर सोलापूर यांचे शेतात सुरू असलेल्या गुळमिश्रीत अवैध हातभट्टी दारु गाळण्याच्या भट्टीवर छापा टाकुन कारवाई केली. त्यामध्ये एकुण १२८५ लीटर गुळमिश्रीत रसायन व ८० लीटर तयार केलेली हातभट्टी दारु असा एकूण ५२,९७५/- रु. किमतीचा मुद्देमाल जागीच नाश केला आहे. सदर कारवाईमध्ये इसम संजय गोपीचंद राठोड, कुमार ऊर्फ बाबु पांडुरंग चव्हाण व प्रियंका कुमार चव्हाण सर्व रा. भोजप्पा तांडा, ता. उत्तर सोलापूर यांचे विरुध्द सलगरवस्ती पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात




आला आहे. १२ जानेवारी २०२६ रोजी गुन्हे शाखेकडील सपोनि शैलेश खेडकर व त्यांचे तपास पथक यांना प्राप्त गोपनिय बातमीदारामार्फत हॉटेल ॲम्बेसिडर ते प्रभाकर महाराज मंदिराकडे जाणाऱ्या रोडवर इसम अमोल बाळासाहेब भोसले हा विविध देशी विदेशी कंपनीच्या दारुच्या बाटल्या बाळगुन विक्री करण्याकरीता घेवुन जात असल्याची माहीती प्राप्त झाली. त्याअनुषंगाने सदर ठिकाणी कारवाई करुन एकुण १,०३,६६०/- रुपये किमतीच्या देशी विदेशी दारुच्या वाटल्या व एक दुचाकी मोटर सायकल जप्त करण्यात आली असून, इसम अमोल बाळासाहेब भोसले रा. मु.पो. कोंडी ता. उत्तर सोलापूर याचे विरुध्द फौजदार चावडी पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखलकरण्यात आला आहे. १२ जानेवारी २०२६ रोजी गुन्हे शाखेकडील पोसई मुकेश गायकवाड व त्यांचे तपास पथक यांना गोपनिय बातमीदारामार्फत गांधीनगर, अक्कलकोट रोड परीसरात इसम नरेंद्र रामलू कोंडा हा विविध देशी विदेशी कंपनीच्या दारुच्या बाटल्या ऑटो रिक्षमधून विक्री करण्याकरीता घेवुन जात असल्याची माहीती प्राप्त झाली. त्याअनुषंगाने सदर ठिकाणी कारवाई करुन एकुण १,३२,५००/- रुपये किमतीच्या देशी विदेशी दारुच्या बाटल्या व एक ऑटो रिक्षा जप्त करण्यात आली असून, इसम नरेंद्र रामलु कोडा रा. गांधीनगर, हनुमान मंदिराजवळ, अक्कलकोट रोड, सोलापूर याचे विरुध्द एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ जानेवारी २०२६ रोजी गुन्हे शाखेकडील सपोनि शंकर घायगुडे व त्यांचे तपास पथक यांना गोपनिय बातमीदारामार्फत कर्णीक नगर येथील स्वतंत्र्य सैनिक रिक्षास्टॉपजवळ इसम संदिप विष्णू शिंदे हा विविध देशी विदेशी कंपनीच्या दारुच्या बाटल्या बाळगुन विक्री करण्याकरीता घेवुन जात असल्याची माहीती प्राप्त झाली. त्याअनुषंगाने सदर ठिकाणी कारवाई करुन एकूण १,१२,८८०/- रुपये किमतीच्या देशी विदेशी दारुच्या बाटल्या व एक मोटर सायकल जप्त करण्यात आली असून, इसम नामे संदिप विष्णू शिंदे रा. मु. पो. दहिटणे, सोलापूर व गोल्ड वाईन शॉप, अशोक चौक, सोलापूरचे मालक यांचे विरुध्द जेलरोड पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही सदरची कामगिरी सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राज कुमार, गुन्हे शाखेचे पोलीस उप आयुक्त डॉ. अश्विनी पाटील, गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेश खेडकर, शंकर धायगुडे, पोराई मुकेश गायकवाड व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

# जिल्ह्यात सुरू असणाऱ्या राष्ट्रीय प्रकल्पांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ६० किलोमीटर रस्त्यांची झाली दैंना

### दुरुस्तीसाठी ४९ कोटी रुपयांची आवश्यकता

**पालघर : वार्ताहर**

पालघर जिल्ह्यात सुरू असणाऱ्या विविध राष्ट्रीय प्रकल्पांकरिता अवजड वाहतूक केल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीखालील सुमारे ६० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची दैना झाली असून त्यांच्या दुरुस्तीसाठी या विभागांनी तब्बल ४९ कोटी रुपयांची मागणी केली आहे. या निधीची उपलब्धता वेळेमध्ये झाल्यास पावसाळ्यापूर्वी या रस्त्यांची दुरुस्ती करणे शक्य होणार आहे. पालघर जिल्ह्यात मुंबई वडोदरा द्रुतगती मार्ग, मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन तर्फे विरार ते डहाणू रोड दरम्यान होणारे चौपदरीकरण, नॅशनल हाय स्पीड रेल्वे कॉर्पोरेशन तर्फे उभारण्यात येणारा बुलेट ट्रेन प्रकल्प तसेच गेल्या वर्षी कार्यरत झालेल्या समर्पित रेल्वे मालवाहू मार्गाचे काम गेल्या काही वर्षापासून सुरू होते. या प्रकल्पांसाठी गौण खनिज (माती, मुरूम, दगड, खडी इत्यादी) वस्तूंची वाहतूक करताना तसेच या प्रकल्पासाठी विविध उपकरणे व साहित्य आणताना झालेल्या अवजड वाहतुकीमुळे पालघर जिल्ह्यातील डहाणू, वसई, तलासरी व पालघर तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीखालील अनेक रस्त्यांची दुरवस्था झाली असून त्याच्या दुरुस्तीसाठी संबंधित राष्ट्रीय प्रकल्पाकडून निधी उपलब्ध व्हावा यासाठी मागणी करण्यात आली आहे.





पालघर तालुक्यात बोरशेती ते रावते (८५० मीटर), पेनंद ते घाटीम (२४०० मीटर), नावजे ते दहिसर फाटा व गिराळे ते पारगाव (२१०० मिटर), पालघर ते माहीम चौकीपाडा (२२५० मिटर), केळवे रोड ते कपासे (२००० मिटर) व नवली ते वरखुंटी (३९५९ मीटर) रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. पालघर तालुक्यामधील रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी अंदाजे १८.४१ कोटी रुपयांची गरज असून रस्ते खराब होण्यासाठी तालुक्यात उभारणीचे काम असणारे तिन्ही राष्ट्रीय प्रकल्प कारणीभूत ठरले आहेत. डहाणू तालुक्यात वाणगाव, साखरे, रानशेत या प्रमुख जिल्हा मार्गावर (१२.४० किलोमीटर) रस्ता खराब झाला असून दापचरी- वंकास- बहारे दरम्यानच्या प्रमुख जिल्हा मार्गावर पाच किलोमीटरचा रस्ता खराब झाला आहे. याखेरीस वेवजी- आंबेसरी ते राज्य मार्ग क्रमांक ७५ दरम्यानचा ६५०० मिटर व ऐना-दाभोण- शिगाव या प्रमुख जिल्हा मार्गावर तीन किलोमीटर रस्त्याचा भाग खराब झाला आहे. या दुरुस्ती, मजबुती व रस्ते सुधारणा करण्याच्या कामासाठी १८.६५ कोटी रुपयांची आवश्यकता भासणार असून यासंदर्भात २.७० कोटी रुपयांची मागणी बुलेट ट्रेन प्रकल्पाकडून व उर्वरित निधी मुंबई वडोदरा द्रुतगती महामार्गाकडून करण्यात आली आहे.

तलासरी तालुक्यात देवजी- आंबेसरी ते राष्ट्रीय महामार्ग ७५ ला जोडणारा प्रमुख जिल्हा मार्गाचा दोन वेगवेगळ्या भागात साडेतीन किलोमीटर व अडीच किलोमीटरचे दोन स्वतंत्र पट्टे खराब झाला झाले आहेत. तसेच राष्ट्रीय मार्ग ७३ पासून वसा- कवाडा (६०० मिटर) व उधवा- खेर्डी (८०० मीटर) या रस्त्याची देखील दुरवस्था झाली आहे. याच बरोबरीने राष्ट्रीय महामार्ग ८ ते उपलाट कोचाई दरम्यानच्या प्रमुख जिल्हा मार्गातील ३१०० मीटरचा पट्टा खराब झाला असून या कामांच्या दुरुस्तीसाठी ७.४५ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. या सर्व रस्त्यांची दुरवस्था नॅशनल हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशनच्या बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे झाल्याचा उल्लेख मागणी पत्रात सार्वजनिक बांधकाम विभागाने केला आहे. वसई तालुक्यातील समर्पित मालवाहू रेल्वे मार्गाच्या उभारणीत एसटी डेपो पारनाका ते अंबाडी दरम्यानच्या २१०० मीटरचा पट्टा खराब झाला असून बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे एसटी डेपो पारनाका, अर्नाळा, विरार, शिरसाट, अंबाडी रस्त्यावरील ९०० मीटरच्या भागातील रस्त्याची दुरवस्था झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. या दुरुस्तीच्या कामासाठी एकूण ४.२० कोटी रुपयांची आवश्यकता भासणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्या मदतीने या सदर्भातील मागणी संबंधित राष्ट्रीय प्रकल्पांच्या व्यवस्थापनाकडे केली असून रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी तातडीने निधी उपलब्ध झाल्यास पावसाळ्यापूर्वी रस्त्यांची दुरुस्ती, डागडुजी व मजबुतीकरण करणे शक्य होईल असे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पालघर कार्यालयातून सांगण्यात आले.

# वसई-विरार महापालिका निवडणूकीत वसई पूर्व भाग बहुजन विकास आघाडीचेच वर्चस्व!



**पारोळ : वार्ताहर**

वसई विरार शहर महानगरपालिका झालेल्या मतमोजणीत बहुजन विकास आघाडीला स्पष्ट बहुमत मिळाला असून या बहुमतामध्ये वसई पूर्व भागातील २० नगरसेवक निवडून आल्याने या भागावर बहुजन विकास आघाडीचे वर्चस्व असल्याचे या निवडणूक निकालात स्पष्ट झाले असून भूमिपुत्र आता बहुजन विकास आघाडीच्या पाठीमागे उभा राहिल्याचे या निवडणूक निकालात दिसून आले आहे. दहा वर्षाच्या प्रतीक्षेनंतर वसई विरार शहर महापालिका निवडणूक प्रक्रिया पार पडली मात्र पार पडलेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत ग्रामीण भागातील काही प्रभागात महायुतीने आघाडी घेतली होती. मात्र या निवडणुकीतही महायुती या ठिकाणी आघाडी घेते का याकडे नागरिकांचे लक्ष लागले होते. ग्रामीण भागात ६ प्रभाग असून ५ प्रभागात बहुजन विकास आघाडीने २० नगरसेवक निवडून आणण्यात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. या सर्व प्रभागांमध्ये मुख्यतः बहुजन विकास आघाडी, भाजप व उद्धव सेना यांच्यामध्ये मुख्य लढत होती. भाजपने प्रभाग एक मध्ये आपल्या पक्षातील कार्यकर्त्यांना डावळून आगरी सेना व श्रमजीवी संघटना या मित्र पक्षांना दोन जागा स्थानिक कार्यकर्ते नाराज होत त्यांनी बहुजन विकास आघाडीमध्ये प्रवेश घेतला होता. श्रमजीवी संघटना व आगरी सेना हे दोन उमेदवार भाजपच्या कमळ या चिन्हावर लढले असले तरी भाजप कार्यकर्त्यांमध्ये प्रचारादरम्यान उत्साह दिसून न आल्याने याचा फायदा बहुजन विकास उमेदवारा होत चारही जागेवर या पक्षाचे उमेदवार विजयी झाले आहेत.

# दुर्गम भागातील आदिवासींसाठी 'न्यूक्लियस बजेट' योजनेंतर्गत अर्ज वाटप व संकलनासाठी विशेष यंत्रणा

**पालघर : वार्ताहर**

दुर्गम आणि आदिवासीबहुल भागातील लाभार्थ्यांपर्यंत शासकीय योजनांचा थेट लाभ पोहोचावा, या उद्देशाने केंद्रवर्ती अर्थसंकल्पाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या न्यूक्लियस बजेट योजनेसाठी अर्ज वाटप व संकलनाची विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या योजनेचा लाभ या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील आदिवासी समाजाला मिळावा, यासाठी २३ जानेवारी पर्यंत कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दुर्गम भौगोलिक परिस्थिती आणि माहितीच्या अभावामुळे अनेक आदिवासी कुटुंबे शासकीय योजनांपासून वंचित राहतात. ही दरी भरून काढण्यासाठी प्रशासनाने थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा निर्णय घेतला असून, विविध ठिकाणी अर्ज वाटप व संकलनाची व्यवस्था करण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू (जि. पालघर) कार्यालयामार्फत अजय रजपूत (७७०९९०२०४१) (लिपीक-टंकलेखक) यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्यामार्फत अर्ज वाटप व संकलन केले जाणार आहे. तसेच तलासरी व कासा परिसरात स्मिता वरखंडे (८४०८९३१४२१) आणि सदानंद भोये (८९९९७५३११७) (लिपीक-टंकलेखक) यांच्या माध्यमातून अनुक्रमे मुलांचे नवीन वसतीगृह, तलासरी तसेच मुलींचे वसतीगृह, कासा येथे ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. टेंभोडे येथील स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्र येथे युवराज करनकाळे (९८९२२२३६९०), तर मनोर परिसरातील शासकीय प्राथमिक आश्रमशाळा, टाकवहाळ येथे संकेत फसाटे (७७९८५६२६४८) यांच्याकडे अर्ज वाटप व संकलनाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याचे संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले असून, लाभार्थ्यांना थेट संपर्क साधता येणार आहे. या उपक्रमामुळे दुर्गम भागातील आदिवासी नागरिकांना शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या न मारता, जवळच्या ठिकाणीच न्यूक्लियस बजेट योजनेचे अर्ज मिळणे आणि सादर करणे सुलभ होणार आहे. अधिकाधिक लाभार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन डहाणू एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी विशाल खत्री यांनी केले.

पान १ वरून....

### पत्नीवरच्या रागामुळे पती संतापाने ...

असल्याचेही पोलिस तपासात पुढे आले आहे. बुधवारी पहाटे आरोपी दारूच्या नशेत होता. याच दरम्यान धनश्रीने पाणी मागितले आणि आधीपासून मनात असलेल्या रागाच्या भरात शेखरने थेट चाकू उचलून मुलीच्या छातीत वार केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. रक्ताच्या थारोळ्यात पडलेली धनश्री मदतीसाठी रडत होती. तिच्या किंकाळ्या ऐकून आजी कुसुमबाई आणि काका उमेश घटनास्थळी धावले. गंभीर जखमी अवस्थेत धनश्रीला तातडीने वाठोडा पोलिस ठाण्यात नेण्यात आले. पोलिसांनी कोणताही विलंब न करता तिला मेडिकल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान डॉक्टरांनी धनश्रीला मृत घोषित केले. या घटनेनंतर परिसरात शोककळा पसरली असून, नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे. आजी कुसुमबाई शेंदरे यांच्या तक्रारीवरून वाठोडा पोलिस ठाण्यात शेखर शेंदरे याच्याविरोधात हत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, घटनेचा सखोल तपास सुरू आहे. कौटुंबिक वादातून एका निष्पाप चिमुकलीचा बळी गेल्याने ही घटना समाजाला अंतर्मुख करणारी ठरत आहे.

### जमिनीचा वाद त्याच्या प्राणावर...

गुप्तांग दाबून उचलून पटकले. यात आरोपीचे मुले विशाल, आकाश आणि पत्नी सुभद्राबाईने मयताच्या पोटात, अंगावर लाथा बुक्याने मारहाण केली. यानंतर बेशुद्धावस्थेत बाबुराव यांना त्यांच्या धाकटा भाऊ राजाराम साखळे याने उपचारासाठी सिल्लोड येथे दाखल करून, पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारादरम्यान शुक्रवारी (७ जुलै) रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास बाबुराव यांची प्राणज्योत मावळली. त्यामुळे याप्रकरणी मयताचा धाकटा भाऊ राजाराम साखळे याने दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी लहान भाऊ भगवान गहेनाजी साखळे, विशाल भगवान साखळे, आकाश भगवान साखळे, सुभद्राबाई भगवानसाखळे (सर्व राहणार लिहाखेडी) यांच्याविरुद्ध अजिंठा ठण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर अजिंठा पोलीस ठाण्याचे सपोनि प्रमोद भिंगारे यांच्या पथकांने यातील तिघांना अटक केली आहे. तर यातील महिला आरोपी फरार झाल्या आहेत. याच भांडणात आरोपी भगवान साखळे याने बुधवारी अजिंठा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून मयत बाबुराव गहेनाजी साखळे, राजू गहेनाजी साखळे, अतुल राजाराम साखळे, ताराबाई बाबुराव साखळे यांच्याविरुध्द ही शिवीगाळ करणे, जबर मारहाण करणे, जीवे मारण्याची धमकी देणे अशा विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पान ८ वरून....

### जागरूक वसई वृत्तपत्र व चैनलतर्फे ...

मुलांना पतंग , तिळगुळ व खाऊ वाटप केले. यावेळी नरेंद्र पाटील यांनी ह्या स्तुत्य कार्यक्रमाचे कौतुक करून मुलांना शुभेच्छा दिल्या. तर आनंद गदगी यांनी मकर संक्रांतीचे महत्व सांगितले. त्याचप्रमाणे जयप्रकाश शर्मा यांनी मुलांना शैक्षणिक माहिती दिली व तिळगुळ चे महत्व पटवून दिले. सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जागरूक वसई वृत्तपत्राचे कार्यकारी संपादक जयप्रकाश शर्मा, युग प्रवासी वृत्तपत्राचे संपादक शिवम मिश्रा, व्हॉईस ऑफ मीडियाच्या जिल्हा कार्यकारिणी सदस्या शहनाज शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.

### सिकलसेल तपासणी विशेष ...

प्रत्येक नागरिकाची सिकलसेल तपासणी करण्याचा संकल्प सार्वजनिक आरोग्य विभागाने केला आहे. त्यानुसार पालघर जिल्ह्यातील नागरिकांनी या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सिकलसेल हा अनुवंशिक व गंभीर रक्ताचा आजार असून, नागरिकांनी सिकलसेल सोल्यूबिलिटी तपासणी करून घ्यावी, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

सिकलसेल आजाराची लक्षणे वेळेवर ओळखणे अत्यंत महत्त्वाचे असून, या आजारामध्ये रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होणे, भूक न लागणे, हात व पायांवर सूज येणे, सांधेदुखी, तीव्र वेदना, लवकर थकवा येणे तसेच चेहरा निस्तेज दिसणे अशी लक्षणे आढळून येतात. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष चौधरी यांनी सांगितले की, सिकलसेल आजाराची वेळीच तपासणी करून योग्य उपचार घेतल्यास रुग्ण निरोगी व सुरक्षित आयुष्य जगू शकतो. त्यामुळे या विशेष पंधरवड्यात आरोग्य विभागाच्या पथकाद्वारे करण्यात येणाऱ्या तपासणीस नागरिकांनी सहकार्य करावे. तसेच मोहिमेत सहभागी असलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांना आवश्यक माहिती देऊन तपासणीस मदत करावी, असे आवाहनही त्यांनी केले. तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या या महत्वाकांक्षी अभियानाचा लाभ घ्यावा व सिकलसेल आजाराबाबत जनजागृती करून समाज निरोगी ठेवण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा,असे देखील त्यांच्यामार्फत सांगण्यात आले.

### वाडा येथे हळदी-कुंकूच्या...

परिसरातील विविध बचत गटांच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून गावातच आपले हक्काचे व्यासपीठ निर्माण करून स्वतःची बँकिंग व्यवस्था उभारण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान महिलांसाठी खेळ व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या उपक्रमांनंतर विजेत्यांना बक्षिसांचे वाटप करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. या उपक्रमामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढीस लागून स्वावलंबनाच्या दिशेने सकारात्मक पाऊल पडल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### सुकडआंबा गावातील जल जीवन...

सदरील टाक्यांचे काम पूर्ण करून सुकडआंबा योजनेतून मार्च २०२६ पर्यंत पाणीपुरवठा सुरू करण्याचे नियोजन आहे. यामुळे गावातील पाणीटंचाई दूर होण्यास मदत होईल. ही योजना आदिवासी बहुल भागातील पाणी समस्या सोडवण्यासाठी महत्त्वाची ठरेल असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला असून स्थानिकांमध्ये यामुळे समाधानाचे वातावरण आहे.

### ४२०० कोटींचं कंत्राट, शहरापासून...

असते. महाराष्ट्रात सध्या जेएनपीए हे १८ मीटर हे सर्वाधिक खोलीचे बंदर आहे. जागतिक स्तरावर चीन, अमेरिका, बेल्जियममध्ये २२, २४, २६ मीटर खोलीची बंदरे आहेत. आता डहाणू तालुक्यातील वाढवण हे बंदर २४ ते २६ मीटर खोलीचे बंदर असेल. वास्तवात पालघर आणि डहाणूचा समुद्र हा अधिक खोलवर म्हणून ओळखला जातो. त्यामुळेच वाढवण व त्यापाठोपाठ मुरबे बंदर हे त्याच परिसरात उभे होणार आहे. हे डीप-ड्राफ्ट म्हणजेच १८.५० मीटर अशा अधिक खोलीचे बंदर असेल.

### शेतकऱ्यांच्या न्यायहक्कासाठी वाडा...

याशिवाय विविध गावांमध्ये रेडी रेकनर व बाजारभावात मोठा फरक असल्याने एक तालुका एक दर लागू करावा, तसेच वनविभागाकडून झाडे व फळबागांचे मूल्यांकन कसे केले जाते याबाबत स्पष्टता द्यावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. धर्मवीर विचार मंचचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच शेकडो बाधित शेतकरी या आंदोलनात सहभागी झाले होते. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा धर्मवीर विचार मंचचे अध्यक्ष मिलिंद पष्टे यांनी दिला.

क्राईम संध्या | सोमवार दि. १९ जानेवारी २०२६ ते रविवार दि. २५ जानेवारी २०२६ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com 




| प्रभाग क्र. | विजयी | पक्ष |
|---|---|---|
| १ | जयंत शंकर बसवंत | बविआ |
| | अस्मिता पाटील | बविआ |
| | सुनंदा प्रमोद पाटील | बविआ |
| | सदानंद गजानन पाटील | बविआ |
| २ | रिना उमाकांत वाघ | भाजप |
| | सान्वी संजोग यंदे | भाजप |
| | रवी श्रीगोपाळ पुरोहित | भाजप |
| | जितेश हरिश्चंद्र राऊत | भाजप |
| ३ | नरेंद्र वसंत पाटील | बविआ |
| | जिनत तन्वीर झाहीदी | बविआ |
| | सुवर्णा राजेंद्र गायकवाड | बविआ |
| | रोहन शंकर सावंत | बविआ |
| ४ | अमृता अतुल चोरघे | बविआ |
| | सुमन ममता दुर्गेश | बविआ |
| | प्रफुल्ल जगन्नाथ साने | बविआ |
| | अजीव यशवंत पाटील | बविआ |
| ५ | गौरव वसंत राऊत | भाजप |
| | संजना गणेश भायदे | भाजप |
| | ॲड. दर्शना त्रिपाठी-कोटक | भाजप |
| | मेहुल अशोक शाह | भाजप |
| ६ | ऋषिका रमाकांत पाटील | बविआ |
| | संगीता किशोर भेरे | बविआ |
| | नारायण सुरेश मांजरेकर | भाजप |
| | हितेश नरेंद्र जाधव | भाजप |
| ७ | प्रतिभा किशोर पाटील | बविआ |
| | मिनू धनंजय झा | बविआ |
| | प्रशांत दत्तात्रय राऊत | बविआ |
| | निशाद अरुण चोरघे | बविआ |
| ८ | नीता सुनील घरत | बविआ |
| | प्रदिपिका अतुल सिंह | बविआ |
| | पंकज पद्माकर पाटील | बविआ |
| | सचिन संभाजी देसाई | बविआ |
| ९ | रुपाली सुनील पाटील | बविआ |
| | सुमन किरण काकडे | बविआ |
| | निलेश दामोदर देशमुख | बविआ |
| | विनोद हरिश्चंद्र जाधव | बविआ |
| १० | किशोर नाना पाटील | भाजप |
| | डिंपल (एकता कौशलेन्द्र सिंह) | भाजप |
| | अंजू हरिकेश तिवारी | भाजप |
| | पंकज दत्तात्रय देशमुख | भाजप |

| प्रभाग क्र. | विजयी | पक्ष |
|---|---|---|
| ११ | नमिता प्रितेश पवार | भाजप |
| | जितेंद्र मनोहर पाटील | भाजप |
| | रसिका राजेश ढगे | भाजप |
| | मनोज गोपाळ पाटील | भाजप |
| १२ | ज्योती दीपक म्हात्रे | बविआ |
| | स्वप्नील जगन्नाथ कवळी | बविआ |
| | रंजना लाडक्या थालेकर | बविआ |
| | डॉमनिक इग्नेशियस रूमाव | बविआ |
| १३ | ॲड.दीप्ती चेतन भोईर | बविआ |
| | सरॅल आलेक्स डाबरे | कॉंग्रेस |
| | मार्शल डॉमनिक लोपीस | बविआ |
| | परेश प्रभाकर किणी | बविआ |
| १४ | सरिता प्रशांत मोरे | बविआ |
| | अतुल रमेश साळुंखे | बविआ |
| | गायत्री अगस्ती सावंत | बविआ |
| | आलमगीर डायर | बविआ |
| १५ | प्रज्ञा कमलाकर पाटील | भाजप |
| | रितू सचिन चौबे | भाजप |
| | योगेश सुरेश प्रसाद सिंह | भाजप |
| | चंद्रकांत यशवंत गोरिवले | भाजप |
| १६ | निलेश रमेश चौधरी | भाजप |
| | मिरा निकम | भाजप |
| | बंटी तिवारी | भाजप |
| | जयप्रकाश सिंह (जे पी सिंह) | भाजप |
| १७ | स्मिता भूपेंद्र पाटील | भाजप |
| | बबिता देवराज सिंह | भाजप |
| | जयप्रकाश सुरेश वझे | भाजप |
| | शरद शंकर सुर्वे | भाजप |
| १८ | गणेश बाळकृष्ण पाटील | भाजप |
| | हेमलता नवीन सिंह | शिंदेसेना |
| | ख्याती संदीप घरत | भाजप |
| | गंगेश्वर लाल अवधेश श्रीवास्तव | भाजप |
| १९ | लता रणधीर कांबळे | बविआ |
| | संतूर धर्मेंद्र यादव | बविआ |
| | प्रफुल्ल गोविंद पाटील | बविआ |
| | अरशद जैनुल्लाह चौधरी | बविआ |
| २० | प्रसन्न सदानंद भाताणकर | बविआ |
| | रमेश जयराम घोरकाना | बविआ |
| | योगिता देवेंद्र पाटील | बविआ |
| | निशा जगदीश भोईर | बविआ |

| प्रभाग क्र. | विजयी | पक्ष |
|---|---|---|
| २१ | विशाल रमेश जाधव | भाजप |
| | प्रार्थना प्रवीण मोंडे | बविआ |
| | काजल नितीन गोपाळे | बविआ |
| | अजित अनंत भोईर | बविआ |
| २२ | अशोक गजानन शेळके | भाजप |
| | पिंकी कंवर ए राठोड | भाजप |
| | कल्पना आशिष नागपुरे | भाजप |
| | अभय रसिकभाई कक्कड | भाजप |
| २३ | अपर्णा पद्माकर पाटील | भाजप |
| | महेश सदाशिव सरवणकर | भाजप |
| | निम्मी निपुण दोषी | भाजप |
| | प्रदीप नरसिंह पवार | भाजप |
| २४ | कल्पेश नारायण मानकर | बविआ |
| | सुवर्णा अजित पाटील | बविआ |
| | पुष्पा संदेश जाधव | बविआ |
| | टीबर्ट (अजय) रॉड्रिग्स अँथोनी | बविआ |
| २५ | रोहिणी निलेश जाधव | बविआ |
| | पंकज नारायण चोरघे | बविआ |
| | अरुणा विजय डाबरे | बविआ |
| | लॉरेल डायगो डायस | बविआ |
| २६ | प्रमिला मनोहर पाटील | बविआ |
| | मार्शलीन अजिल चाको | बविआ |
| | प्रकाश दुमा रॉड्रिग्ज | बविआ |
| | चंद्रशेखर शांताराम धुरी | बविआ |
| २७ | ज्योत्स्ना शरद भगली | बविआ |
| | सुनील मोरेश्वर पाटील | बविआ |
| | दिपा सुजेश पाटील | बविआ |
| | कन्हैया (बेटा) मनोहर भोईर | बविआ |
| २८ | आशिष जयेंद्र वर्तक | बविआ |
| | ज्योती मच्छिंद्र धोंडेकर | बविआ |
| | बिना मायकल फुटचाडो | बविआ |
| | प्रविण चिन्या शेट्टी | बविआ |
| २९ | अलका सतीश गमज्या | बविआ |
| | डॉ. शुभांगी हेमंत पाटील | बविआ |
| | अफिफ जमील अहमद शेख | बविआ |




# भाजपला धोबीपछाड, ‘बविआ’चा दणदणीत विजय

**वसई : वार्ताहर**

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांत झालेल्या पराभवानंतर अवघ्या वर्षभरातच घेण्यात आलेल्या वसई-विरार महापालिका निवडणुकीत बहुजन विकास आघाडीने पुन्हा एकदा आपली ताकद दाखवली आहे. यापूर्वीच्या दोन्ही निवडणुकांमध्ये या महापालिकेवर असलेले वर्चस्व कायम ठेवत वसई-विरार महापालिकेचा गड बविआने राखला आहे.

सन २००९मध्ये महापालिका स्थापन झाल्यानंतर दोन निवडणुका पार पडल्या आहेत. या दोन्ही निवडणुकांमध्ये बहुजन विकास आघाडीची सत्ता या महापालिकेवर राहिली आहे. विशेष म्हणजे, सन २०१५मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीत ११५पैकी तब्बल १०७ नगरसेवक निवडून आणत बविआने त्यांचे या शहरावर एकहाती राजकीय वर्चस्व असल्याचे दाखवून दिले होते. तसेच सन २०१९मध्ये पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत बविआ अध्यक्ष हितेंद्र ठाकूर यांच्यासह क्षितिज ठाकूर आणि राजेश पाटील हे तीन आमदार म्हणून निवडून आले. दरम्यानच्या काळात महापालिकेची निवडणूक झाली नाही. मात्र गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत बविआला तीनही विधानसभा मतदारसंघांत फटका बसला. एक वर्षाचा कालावधी उलटत नाही, तोच वसई-विरार महापालिकेची निवडणूक जाहीर झाली. एकीकडे पालघर जिल्ह्यात भाजपचे खासदार, तसेच पाच आमदार महायुतीचे असल्यामुळे वसई-विरार महापालिकेची निवडणूक सहज जिंकणे बविआसाठी सोपे नव्हते. अशातच बविआच्या काही माजी नगरसेवकांनी निवडणुकीच्या पूर्वी भाजपसोबत घरोबा केला. त्याचप्रमाणे काही पदाधिकाऱ्यांनीही बविआची साथ सोडली. दुसरीकडे, भाजपने ही निवडणूक प्रतिष्ठेची करत राज्याचे मत्स्यव्यवसायमंत्री नितेश राणे, खासदार डॉ. हेमंत सवरा, माजी खासदार पूनम महाजन यांच्यासह पालघर जिल्ह्यातील महायुतीच्या पाचही आमदारांवर या पालिकेची विशेष जबाबदारी टाकली. यासोबतच वसई-विरारचा विकास करण्याची हमी नागरिकांना मुख्यमंत्र्यांकडून देण्याचे काम भाजपने केले. उत्तर भारतीय मतदारांना भाजपकडे खेचण्यासाठी सुप्रसिद्ध गायिका, तसेच बिहारच्या नवनिर्वाचित आमदार मैथिली ठाकूर यांच्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अशा प्रकारे भाजपने गल्लीतील कार्यकर्त्यापासून प्रदेशच्या नेत्यांपर्यंत सर्वांकडूनच या निवडणुकीसाठी व्यूहरचना केली.

भाजपच्या या रणनीतीसमोर बविआ अध्यक्ष हितेंद्र ठाकूर आणि क्षितिज ठाकूर, अजीव पाटील, प्रवीणा ठाकूर, सिद्धार्थ ठाकूर, नारायण मानकर, जितू शहा यांच्यासह आपले जुने कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांची फळी सक्रिय करत निवडणुकीची तयारी केली. कॉंग्रेस, शिवसेना (उबाठा), मनसे अशा सर्वच राजकीय पक्षांसोबत आघाडी केल्यास होणाऱ्या फायदा आणि तोट्यांचा अभ्यास करून अखेर ठाकूर यांनी ही निवडणूक स्वबळावरच लढण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय त्यांच्या पथ्थ्यावरच पडल्याचे आलेल्या निकालावरून दिसून येते. सन २०१५च्या निवडणुकीच्या तुलनेत निवडून आलेल्या सदस्यसंख्येत घट झाली असली, तरी यावेळी बहुमताच्या मॅजिक आकड्यापेक्षा सदस्यांचा मोठा आकडा बविआने गाठला आहे. त्यामुळे सलग तिसऱ्यांदा वसई-विरार महापालिकेवर बविआचाच महापौर बसणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. विधानसभा निवडणुकीत स्वीकारलेला पराभव बविआ नेत्यांपेक्षा सामान्य कार्यकर्त्यांचाच जिव्हारी लागल्याचे या निकालावरून दिसून येत आहे. बविआच्या जुन्या कार्यकर्त्यांनी या निवडणुकीत उमेदवारीवरून कोणतेही आरोप-प्रत्यारोप न करता पक्षाकडून देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी मेहनत घेतली. त्यामुळेच वसई-विरार महापालिकेच्या सभागृहात बविआचे ७१ शिलेदार पोहोचले आहेत.

ओबीसी आरक्षणात वाढ झाल्याने पालघर जिल्हा परिषदेची निवडणूक सध्या होणार नाही. मात्र लवकरच निवडणुकीचा कार्यक्रमही जाहीर होणार आहे. तालुक्यासह इतर तालुक्यांतील बविआची संघटनशक्ती आणि महापालिकेच्या निवडणुकीत मिळालेल्या या यशामुळे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतही बहुजन विकास आघाडी मोठ्या ताकदीने मैदानात उतरण्याची शक्यता आहे. वसई तालुक्यात येणाऱ्या चार जिल्हा परिषद गटांसह पंचायत समितीच्या आठ गणांची निवडणूक बहुजन विकास आघाडीला अधिक सोपी झाल्याचे जाणकारांकडून सांगितले जात आहे.

# लातूर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीसाठी विविध पथके गठीत - जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

**लातूर : वार्ताहर**

राज्य निवडणूक आयोगाने १३ जानेवारी २०२६ रोजी लातूर जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत येणाऱ्या लातूर, औसा, रेणापूर, चाकूर, अहमदपूर, उदगीर, जळकोट, निलंगा, शिरूर अनंतपाळ व देवणी या १० पंचायत समित्यांचा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. या निवडणुकीची अधिसूचना १६ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध झाली असून ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होईल. तसेच ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. ही निवडणूक प्रक्रिया शांततेत व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी आवश्यक पथके स्थापन करण्यात आली आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी गणेश पवार, उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर यांच्यासह विविध प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. निवडणूक अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून म्हणजेच १६ जानेवारी २०२६ ते २१ जानेवारी २०२६ या कालावधीत नामनिर्देशनपत्रे स्वीकारली जाणार आहेत. मात्र, १८ जानेवारी २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने नामनिर्देशनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत. या नामनिर्देशनपत्रांची छाननी २२ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. तसेच २३, २४ आणि २७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या कालावधीत नामनिर्देशनपत्रे मागे घेता येतील. २७ जानेवारी रोजी दुपारी ३.३० नंतर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे व चिन्ह वाटपाची कार्यवाही केली जाईल. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत मतदान होणार आहे, तसेच ७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० पासून मतमोजणी केली जाणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली. जिल्ह्यात एकूण ५९ जिल्हा परिषद गट आणि ११८ पंचायत समिती गण आहेत. अंतिम मतदार यादीनुसार जिल्ह्यात एकूण १४ लाख ९९ हजार १९० मतदार असून, यामध्ये ७ लाख ८६ हजार ६८३ पुरुष आणि ७ लाख १२ हजार ४९४ महिला मतदारांचा समावेश आहे. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत मतदारांच्या संख्येत १९ हजार ९०० ने वाढ झाली आहे. जिल्ह्यात एकूण १ हजार ७५३ मतदान केंद्रे स्थापित केली जाणार असून यामध्ये १३ महिला संचलित, ११ युवा संचलित आणि ६ दिव्यांग संचलित मतदान केंद्रे असतील. सर्व केंद्रांवर रॅम्प, व्हीलचेअर, पिण्याचे पाणी, शेड आणि स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय असेल. या निवडणूक प्रक्रियेसाठी एकूण १० हजार ५१८ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. जिल्हा परिषद उमेदवारासाठी ६ लाख रुपये आणि पंचायत समिती उमेदवारासाठी ४.५ लाख रुपये खर्च मर्यादा निश्र्चित करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी भरारी पथके व स्थिर संनियंत्रण पथके तैनात केली आहेत. सर्व मतदारांनी या लोकशाहीच्या उत्सवात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी कायदा व सुव्यवस्थाविषयक तयारीच्या अनुषंगाने माहिती दिली. दरम्यान जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक नामनिर्देशनपत्रे अहमदपूर तालुका- तहसिलदार अहमदपूर यांचे दालन, तहसिल कार्यालय, अहमदपूर जळकोट तालुका- मुख्याधिकारी यांचे दालन, प्रशासकीय इमारत, जळकोट, उदगीर तालुका- उपविभागीय अधिकारी उदगीर यांचे दालन, महसूल भवन, छत्रपती शिवाजी महाराज चौक, उदगीर, देवणी तालुका- सभागृह, तहसील कार्यालय, देवणी, शिरूर अनंतपाळ- तहसीलदार यांचे कक्ष, तहसील कार्यालय, शिरूर अनंतपाळ, चाकूर तालुका- तहसील कार्यालय चाकूर येथील तहसीलदार चाकूर यांचे दालन, रेणापूर तालुका- तहसीलदार यांचे दालन, तहसील कार्यालय, रेणापूर, लातूर तालुका- तहसीलदार लातूर यांचे कोर्ट हॉल, तहसील कार्यालय, लातूर, औसा तालुका- कोर्ट हॉल, तहसील कार्यालय, औसा, निलंगा तालुका- कार्यशाळा, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बिदर रोड, निलंगा या ठिकाणी स्वीकारली जाणार आहेत.

# भिवंडीत प्रभाग एकमध्ये कोणार्कचे चारही उमेदवार विजयी

## भाजप आमदार महेश चौघुले यांच्या मुलाचा पराभव



**भिवंडी : वार्ताहर**

महापालिका निवडणुकीत प्रतिष्ठितची समजली जाणारी प्रभाग एक मधील अत्यंत चुरशीच्या निवडणुकीत अखेर कोणार्क विकास आघाडीने विजयी मिळवला आहे.

कोणार्क विकास आघाडीच्या चारही उमेदवारांचा विजय झाला आहे.तर भाजप आमदार महेश चौघुले यांचा मुलगा मित महेश चौघुले यांच्यासह प्रभाग एक मधील भाजपचे चारही उमेदवार पराभूत झाले आहेत. कोणाच्या विजयानंतर कोणार्क समर्थकांचा माजी महापौर प्रतिभा विलास पाटील यांनी हातात बॅट पकडून ढोल ताशांच्या गजरात नाचत जल्लोष साजरा केला असून भाजप कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरली असून प्रभाग एक मधील भाजपचे सर्व कार्यालयांना टाळे लावण्यात आले आहेत.

प्रभाग एक अ मधून कोणार्क विकास आघाडीच्या नेहा नवीन काठवले विजयी झाल्यजें आहेत त्यांनी भाजपच्या पद्मा कृष्णा गाजेंगी यांचा पराभव केला आहे.

प्रभाग १- ब - मधून कोणार्क विकास आघाडीच्या माजी महापौर प्रतिभा विलास पाटील विजयी झाल्या आहेत त्यांनी भाजपच्या स्नेहा विकास बाफना यांचा पराभव केला आहे.

प्रभाग १ - क - मधून कोणार्क विकास आघाडीचे मयुरेश विलास पाटील विजयी झाले असून त्यांनी भाजप आमदार महेश चौघुले यांचा मुलगा मित महेश चौघुले यांचा पराभव केला आहे.

प्रभाग १ - ड - मधून कोणार्क विकास आघाडीचे माजी महापौर विलास रघुनाथ पाटील विजयी झाले असून त्यांनी भाजपचे रितेश गुरुनाथ टावरे यांचा पराभव केला आहे.

# लातूरच्या नागरिकांनी भाजपचे असंस्कृत राजकारण हाणून पाडले

## माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूरकरांचे मानले जाहीर आभार



**लातूर : वार्ताहर**

शांत सुरक्षित आणि सुसंस्कृत लातूर असंस्कृत राजकारण स्विकारत नाही हे येथील जनतेने महानगरपालिका निवडणुकीच्या माध्यमातून दाखवून दिले आहे असे नमूद करून या निवडणुकीत काँग्रेस वंचित बहुजन आघाडीला विक्रमी ऐतिहासिक विजय मिळवून दिल्याबद्दल माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूरकरांचे जाहीर आभार मानले.

लातूर महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस वंचित बहुजन आघाडीने ७० पैकी ४७ जागा जिंकून ऐतिहासिक विजय संपादन केल्यानंतर, आज दुपारी दोन्ही पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी शहरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन केले, त्यानंतर शहरात ठिकठिकाणी जल्लोष साजरा केला, सायंकाळी सर्व विजयी उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते काँग्रेस भवन येथे एकत्र झाले असता माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी या जल्लोषातत सहभागी होऊन सर्वांचे अभिनंदन केले लातूरकरांचे जाहीर आभार मानले. याप्रसंगी खासदार मा.डॉ. शिवाजी काळगे, माजी आमदार, जिल्हा बँकेचे अध्यक्ष धीरज देशमुख, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अभय साळुंखे, शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष ॲड. किरण जाधव, सौ. अदिती देशमुख यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना माजी मंत्री आमदार देशमुख म्हणाले की, महाराष्ट्रातील शांत सुरक्षित, विकसित शहर म्हणून ओळख असलेल्या लातूरमध्ये महानगरपालिका निवडणूक काळात

भाजपच्या नेत्यांनी व पदाधिकाऱ्यांनी येथे येऊन द्वेषाचे राजकारण केले. येथील नेतृत्वाबद्दल असंस्कृत वक्तव्य केली, संपूर्ण लातूरला एक कुटुंब म्हणून सांभाळणारे आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर साहेब, आदरणीय शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेब, आदरणीय विलासरावजी देशमुख साहेब यांच्या आठवणी लातूरकरांच्या मनावर कोरलेल्या आहेत. त्या कधीही पुसणार नाही हे ह्या निवडणुकीच्या निमित्ताने लातूरकरांनी दाखवून दिले आहे. देशात आणि राज्यात एकत्र सरकारमध्ये असलेल्या भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या पक्षाच्या नेत्यांनी कटकारस्थान करून या निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या मताची विभागणी करण्याचा प्रयत्न केला परंतु हा प्रयत्नही लातूरकरांनी हाणून पाडला आहे, काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी अहोरात्र परिश्रम घेऊन पक्षाला विजय मिळवून दिला आहे. त्यामुळे या निवडणुकीतील त्यांचे योगदान खूप मोठे आहे, अनेक इच्छुकांनी या पक्षाकडे उमेदवारी मागितली होती मात्र ज्यांना उमेदवारी मिळाली नाही त्यांनी बंडखोरीचा मार्ग न स्वीकारता पक्षासाठी काम केले, ज्यांनी ज्यांनी पक्षासाठी या निवडणुकीत योगदान दिले त्या सर्वांसाठी पक्ष सकारात्मक विचार करून योग्य वेळी योग्य संधी देण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## निवडणूक जिंकली ती खऱ्या अर्थाने लातूरच्या सुजाण मतदारांनीच!



लातूरची जनता जेवढी शांत, संयमी, सहनशील आहे ती तेवढीच विचारी आणि संवेदनशील सुद्धा आहे हे या निवडणुकीतील निकालाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. लातूरकर जनतेच्या मनाचा तळ गाठणे एवढं सोपं नाही हे सत्य विसरता कामा नये. आम्ही संवादावर विश्वास ठेवतो संघर्षावर नाही यावरही शिक्कामोर्तब करणारे निकाल लागले. निवडणूक काळातील किळसवाणे वक्तव्ये, सत्तेसाठीचा हव्यास, संधीसाधू प्रवृत्ती आणि त्यातून घेतलेले काही निर्णय, राजकीय संघर्षातून शहरात घडलेल्या अप्रिय घटना लातूरकरांच्या पचनी पडल्या नाहीत. आम्ही राजकीय पक्षांच्या पुढे जाऊन विचार करतो हे या निकालाने राज्याला दाखवून दिले. राजकरणात वैचारिक मतभेद असावेत पण या सत्तासंघर्षात मुजोरी, मग्रुरीला थारा नाही हे ही स्पष्ट झाले. राजकारणातील सुसंस्कृतपणा जपणे ही प्रामुख्याने राजकीय नेत्यांची जबाबदारी आहे मात्र दुर्दैवाने ही धुरा लातूरच्या सुज्ञ मतदारांनी आपल्या खांद्यावर घेतली. लातूरच्या संस्कृतीला गालबोट लागेल अशा राजकारणापासून दूर राहण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न राज्याच्या दुषित होत चाललेल्या उग्र राजकारणाला नवी दिशा देणारा आहे यात शंका नाही. लोकशाहीत मतदारच खरा राजा असतो हेच अंतिम सत्य आणि म्हणून निवडणूक जिंकली ती लातूरच्या सुजाण नागरिकांनी.

– सतीश तांदळे, माझं लातूर परिवार

## जागरूक वसई वृत्तपत्र व चैनलतर्फे मुलांना पतंग व तिळगुळ वाटप



**वसई : वार्ताहर**

व्हॉईस ऑफ मिडिया पालघर जिल्हा महिला विंग व जागरूक वसई वृत्तपत्र आणि चॅनेलच्या माध्यमातून व्हॉईस ऑफ मीडियाचे महिला विंग पालघर जिल्हाध्यक्षा व जागरुक वसईच्या संपादिका सौ. सोनल प्रसाद महाडिक यांच्यामार्फत मकरसंक्रांती निमित्त वसई किल्ल्यातील सेंट गोंसालो गार्सिया स्कूल व अनाथालयातील मुलांना पतंग, तिळगुळ व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी व्हॉईस ऑफ मिडियाचे पालघर जिल्हाध्यक्ष नरेंद्र एच. पाटील, ज्येष्ठ पत्रकार आनंद गदगी, जागरुक वसईचे कार्यकारी संपादक जयप्रकाश शर्मा, गार्सिया स्कूलचे नॉबार्ड डिसोझा, समाजसेविका सारिका सकपाळ, युग प्रवासीचे संपादक शिवम मिश्रा, युग प्रवासीच्या उपसंपादिका शहनाज शेख आदि मान्यवर उपस्थित होते. व्हॉईस ऑफ मीडियाच्या महिला विंग पालघर जिल्हाध्यक्षा व जागरूक वसई वृत्तपत्र व चैनलच्या संपादिका सौ. सोनल प्रसाद महाडिक यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मकरसंक्रांतीच्या तिळगुळाचा आनंद आश्रमातील मुलांसह साजरा करून त्यांना या उत्सवात सामील करून घेता यावे यासाठी हा कार्यक्रम येथे घेण्यात आल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित पाहुण्यांनी ...पान ६ वर

## शिक्षक समिती संघटनेच्या लातूर जिल्हाध्यक्ष पदी अब्दुलनबी चौधरी यांची निवड



**देवणी : वार्ताहर**

महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक समिती संघटना लातूर जिल्हा शाखेची नूतन कार्यकारिणी राज्य नेते विजय भोगेकर, राजाध्यक्ष प्रसाद पाटील, राज्य सरचिटणीस हरीश ससनकर, दिलीप कुमार गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत नूतन कार्यकारणीची निवड जाहीर करण्यात आली. नूतन कार्यकारिणी खालील प्रमाणे लातूर जिल्हाध्यक्ष पदी अब्दुल नबी चौधरी, जिल्हा सचिव लक्ष्मण चींते, सहसचिव आर के जहागीरदार, कार्याध्यक्ष वीरेंद्र चामे, कोषाध्यक्ष नारायण निडेबने, जिल्हा संघटक एफ आर परकोटे, आर जी जळकोटे, संजय पारशेट्टे, सल्लागार संजीवकुमार सगर, उपाध्यक्ष विश्वजित निडवंचे, सुदर्शन पाटील आदींची निवड करण्यात आली या निवडी बद्दल मोरे जी.बी, पेठकर एम.डी, भुरे बी.टी, जिल्हा परीषद प्रश्नाला देवणीचे मुख्याध्यापक जी.बी. सुर्यवंशी, रफी बागवान, गोविंद जाधव, बाळासाहेब नराळे, उदय कुलकर्णी, अन्सारी आदींनी केले आहे.

## मनीष देहेरकर यांची वाडा नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षपदी निवड




**वाडा : प्रतिनिधी**

वाडा नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्ष पदासाठी भारतीय जनता पार्टीकडून मनीष चंद्रकांत देहेरकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. नगरपंचायतीच्या विशेष सभेत ही निवड प्रक्रिया शांततेत आणि एकमताने पार पडली. याच सभेत भाजपचे हर्षल खांबेकर व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे विराज पाटील यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड करण्यात आली. या निवडीमुळे नगरपंचायतीतील प्रशासनाला अधिक बळ मिळाले असून सर्वपक्षीय समन्वयातून शहराच्या विकासाला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. नवीन उपनगराध्यक्ष मनीष देहेरकर यांनी पदभार स्वीकारताना वाडा शहरातील नागरी सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता व आरोग्य सेवांमध्ये सुधारणा करण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल, असे सांगितले. तसेच सर्व नगरसेवकांना विश्वासात घेऊन पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. या निवडीबद्दल भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मनीष देहेरकर, हर्षल खांबेकर व विराज पाटील यांचे अभिनंदन करून शुभेच्छांचा वर्षाव केला.

## सिकलसेल तपासणी विशेष पंधरवडा

### नंडोरे येथे 'अरुणोदय – सिकलसेल निमिया विशेष अभियान'चा शुभारंभ

**पालघर : वार्ताहर**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सिकलसेल तपासणी विशेष पंधरवडा राबविण्यात येत असून, या मोहिमेअंतर्गत घरोघरी सिकलसेल तपासणी, निदान, उपचार व संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या विशेष अभियानाचा शुभारंभ दि. १५ जानेवारी २०२६ रोजी नंडोरे आयुष्यमान आरोग्य मंदिर, पालघर येथे अरुणोदय – सिकलसेल निमिया विशेष अभियान या नावाने करण्यात आला. या कार्यक्रमाला जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रामदास मराड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष चौधरी, डॉ. योगेश सुरळकर (निवासी वैद्यकीय अधिकारी), डॉ. वैदही (DRCHO), डॉ. दीपक वाणी (नोडल अधिकारी), तालुका आरोग्य अधिकारी डॉ. तन्वीर शेख, जिल्हा सिकलसेल समन्वयक इंदल जाधव, उकज प्रतीक्षा गिरे, अंकिता जाधव (तालुका सिकलसेल नोडल अधिकारी) यांच्यासह आरोग्य विभागातील आशा सेविका व BF कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रम मा. उपसंचालक डॉ. अशोक नांदापूरकर तसेच विभागीय नोडल अधिकारी डॉ. सुहास माने यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. राज्यात सिकलसेल आजाराचे प्रमाण अधिक असलेल्या २१ जिल्ह्यांतील ...पान ६ वर

## वाडा येथे हळदी-कुंकूच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी बनण्याचे आवाहन



**वाडा : वार्ताहर**

वाडा तालुक्यातील आंबिस्ते बुद्रुक येथे चैतन्य संस्था प्रेरित प्रेरणा ग्रामीण महिला स्वयं सिद्ध संघ, कुडूस यांच्या माध्यमातून समर्थ ग्रामविकास समिती, आंबिस्ते बुद्रुक यांच्या सहकार्याने महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पारंपरिक सणाच्या माध्यमातून महिलांना एकत्र आणत स्वावलंबनाचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमाला संघाच्या जिल्हा व्यवस्थापक राजश्री तरसे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी महिलांना बचत गटांचे महत्त्व पटवून देत विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती दिली. उद्योग आधार कार्डची उपयुक्तता समजावून सांगताना, महिलांनी एकत्र येऊन बचत गट अधिक सक्षम केल्यास कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीस हातभार लावता येतो आणि स्वतःही स्वावलंबी होता येते, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. हळदी-कुंकू हा केवळ सण नसून महिलांना संघटित होण्याचे, विचारांची देवाणघेवाण करण्याचे आणि पुढील आर्थिक वाटचालीची दिशा ठरविण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षिका ऐश्वर्या मढवी व निशा पाटील, संघाच्या अकाऊंटर रेवती मांजे यांच्यासह ...पान ६ वर

## सुकडआंबा गावातील जल जीवन मिशन योजनेचे काम सुरु

### मार्च २०२६ पर्यंत पाणीपुरवठा सुरु होण्याचे नियोजन



**डहाणू : वार्ताहर**

जल जीवन मिशन अंतर्गत डहाणू तालुक्यातील मौजे सुकडआंबा येथील नवीन पाणी पुरवठा योजनेच्या शिरसोनपाडा येथील उंच साठवण टाकीच्या टॉप स्लॅब लगत लँडिंग स्लॅब कोसळून २ शाळकरी मुलींचा मृत्यू झालेला होता. या दुर्घटनेनंतर प्राप्तस्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्टनुसार सदर योजनेतील समाविष्ट तिन्ही टाक्या पाडण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या मार्फत ३ जुलै २०२५ रोजी कंत्राटदारास देण्यात आले होते. त्यानुसार डिसेंबर २०२५ रोजी तिन्ही टाक्या कंत्राटदारामार्फत पूर्णपणे पाडण्यात आल्या. त्यानंतर कंत्राटदाराने आदेशाचे पालन करून नवीन टाक्या बांधण्याचे काम सुरू केले आहे. सध्या पाटिलपाडा, जुनुनपाडा व शिरसोनपाडा येथील उंच पाणी साठवण टाक्यांचे काम सुरू आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार हे काम सुरू असून, ...पान ६ वर

## ४२०० कोटींचं कंत्राट, शहरापासून २० किमीवर उभारलं जातंय मोठं बंदर; पण कांदळवन बाधित होणार; आता मंजुरी रखडली!



**मुंबई : वार्ताहर**

महाराष्ट्र सागरी मंडळाकडून पालघर जिल्ह्यात उभे होणारे मुरबे बंदर किनारपट्टी नियमन क्षेत्रासंबंधीच्या (सीआरझेड) पूर्ततेअभावी रखडले आहे. या बंदरासंबंधी कामांमुळे ३५ हजार चौरस मीटरहून अधिक क्षेत्रावरील कांदळवन बाधित होणार आहे. मात्र त्यातील खारफुटीच्या नेमक्या झाडांची माहिती नसल्याने तूर्तास बंदराची सीआरझेडसंबंधीची मंजुरी रखडली आहे. महाराष्ट्र सागरी मंडळाने पालघर जिल्ह्यात पालघर शहरापासून २० किमी अंतरावर मुरबे येथे बहुउद्देशीय बंदर उभारणीचे नियोजन केले आहे. वार्षिक १३४ टन कार्गो हाताळणीसह एकूण चार हजार दोनशे कोटी रुपये खर्चाच्या या बंदराचे कंत्राट खासगी कंपनीला याआधीच देण्यात आले आहे. मात्र त्यात सीआरझेडसंबंधी अडथळा आला आहे. या बंदरासाठी टर्मिनल इमारत, जेट्टी, पोहोच मार्ग, कंटेनर यार्ड, नैसर्गिक आणि पेट्रोलियम वायू साठवणुकीची सुविधा, जहाजे उभे करण्याचे विविध तळ, कार्गो हाताळणी परिसर अशा प्रकारची एकूण २८ कामे प्रस्तावित आहेत. ही सर्व जागा किनारपट्टी नियमन क्षेत्राच्या सात श्रेणीत आहे. त्यातील दोन श्रेणी हा कांदळवनासंबंधी असून एक श्रेणी 'ना विकास क्षेत्रा'तील आहे. कांदळवनासाठीच्या दोन श्रेणीपैकी एक श्रेणी थेट कांदळवनाचा भाग असून एक राखीव क्षेत्रातील आहे. त्यानुसार या बंदरासाठी थेट कांदळवनाच्या तीन हजार पाचशे चौरस मीटरहून अधिक क्षेत्रफळाचा समावेश आहे. तर बत्तीस हजार चौरस मीटरहून अधिक जागा ही राखीव (५० मीटर बफर) श्रेणीतील आहे.

या पार्श्वभूमीवर बंदराला सीआरझेड नियमानुसार परवानगी द्यावी, असा विनंती अर्ज महाराष्ट्र सागरी मंडळांतर्गत खासगी बंदर विकासकाने महाराष्ट्र किनारपट्टी क्षेत्र नियमन प्राधिकरणाकडे केला होता. त्यावर प्राधिकरणाच्या अलीकडेच झालेल्या १९२ व्या बैठकीत चर्चा झाली. त्यानुसार, बंदराच्या पर्यावरणीय प्रभाव अहवालात विविध प्रकारचे मुद्दे मांडण्यात आले आहेत. मात्र कांदळवनासंबंधी नेमकी किती खारफुटीची झाडे कापावी लागतील, हे नमूद नाही. तसेच बंदराचा मासेमारीवर होणारा परिणाम, समुद्री जैवविविधतेवर होणारा परिणाम यांचा अहवालात समावेश आहे. यामुळेच प्रकल्प नियोजकांनी कांदळवनाची प्रत्यक्ष पाहणी करून खारफुटींच्या झाडांचा नेमका आकडा मांडावा, मत्स्य व्यवसायाबाबत केंद्रीय समुद्री मत्स्यव्यवसाय संशोधन संस्था व समुद्री जैवविविधतेसंबंधीचा अभ्यास अहवाल तयार करून तो मांडावा. त्याआधारे पुन्हा मंजुरीसाठी अर्ज करावा, अशी सूचना देत एमसीझेडएमएने तूर्तास या बंदराला थांबा दिला आहे. कुठलेही बंदर हे त्याच्या खोलीवर अवलंबून असते. याचाच अर्थ त्या बंदरात किती खोल किंवा किती उंचीचे जहाज येऊ शकते, त्यावर बंदराचे महत्त्व अधोरेखित होत ...पान ६ वर

## शेतकऱ्यांच्या न्यायहक्कासाठी वाडा येथे 'निद्रा' आंदोलन



**वाडा : वार्ताहर**

धर्मवीर विचार मंचच्या वतीने वाडा, विक्रमगड व जव्हार तालुक्यातील विद्युत वाहिनी व मनोरे प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकरी व जमीन मालकांच्या न्याय्य हक्कांसाठी सोमवारी (दि. १२ जाने.) वाडा उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर निद्रा आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. बोईसर-पुणे, नवसारी-पडघा दरम्यान खावडा पॉवर ट्रान्समिशन लाईन या प्रकल्पांमुळे हजारो एकर शेती व बागायती जमीन बाधित झाली असून संबंधित शेतकऱ्यांना अपुरा मोबदला, चुकीचे मोजमाप व विलंबित नोटिसा दिल्याचा आरोप आंदोलकांनी केला. आंदोलनावेळी उपस्थितांनी प्रमुख मागण्या मांडल्या. त्यामध्ये बाधित शेतकऱ्यांना एकसमान दराने प्रति चौ. मीटर किमान १० हजार रुपयांचा मोबदला देणे, मनोरे व विद्युत वाहिन्यांमुळे नुकसान झालेल्या जमिनींची तातडीने नोंद करून अधिकृत नोटिसा देणे, तसेच विद्युत वाहिनीखालील क्षेत्रासाठी १०० टक्के मोबदला व बागायती पिकांसाठी पाच पट भरपाई देण्याची मागणी करण्यात आली. ...पान ६ वर